अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

ओपिनियन पोल : महाराष्ट्रात धक्कादायक निकाल, कोणाला किती जागा

मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी आता वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक राहिला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपचा तिसऱ्यांदा सत्तेत येण्याचा प्रयत्न असेल. तर मोदींच्या विरोधात सर्व विरोधी पक्षांनी इंडिया अशी नवी आघाडी तयार केली आहे. या आघाडीचा प्रयत्न असेल की २०२४ साली देशात सत्ता बदल करायचा. पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीत कोणाचे सरकार येणार? पंतप्रधान कोण असेल? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील? या सर्व प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी इंडिया टीव्ही आणि सीएनएक्स यांनी ओपिनियम पोल घेतला होता.

या ओपिनियम पोलमधील महाराष्ट्रात कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील हे समोर आले आहे. देशात आज लोकसभेच्या निवडणुका झाल्या तर उत्तर प्रदेशनंतर सर्वाधिक जागा असलेल्या महाराष्ट्रातील ४८ पैकी २० जागांवर भाजपचा विजय होईल असे या ओपिनियन पोलमध्ये म्हटले आहे. भाजपनंतर सर्वाधिक जागा काँग्रेसला मिळतील, त्यांना ९ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर शिवसेना शिंदे गटला फक्त २ जागा तर शिवसेना ठाकरे गटाला ११ जागा मिळू शकतील. राष्ट्रवादीत अजित पवार गटाला फक्त २ तर शरद पवार गटाला ४ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आलाय.

www.surajyadigital.com | रविवार, दि. ३० जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३०१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

लाचखोरांची 'मुजोरी' जिरवणार, खाल्लेली 'मलई' महागात पडणार

शिक्षण खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आरोपपत्र दाखल

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या शिक्षण खात्यात भ्रष्टाचार बोकाळला आहे. अगदी 'वर'पासून ते 'खाली'पर्यंत लाचेची कीड लागली आहे.कितीही कारवाया झाल्या तरी ही खाबूगिरी नष्ट होत नाहीय.केवळ लिपिक नाही तर शिक्षणाधिकारीसारखे वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पैसे खाण्याची चटक लागली आहे. शिक्षण खात्यातील लाचखोरांची मुजोरी जिरवण्यासाठी शिक्षण खात्यानेच कठोर पाऊल उचलले आहे. शिक्षण आयुक्तांच्या पत्रानुसार लाचलुचपत प्रतिबंधक अर्थात एसीबीने चौकशी करून अखेर राज्यातील ३३ अधिकाऱ्यांवर आरोपपत्र दाखल केल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.या प्रकरणात सोलापूरच्या शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याचे सांगण्यात आले.



राज्यातील लाचखोर ३६ शिक्षण अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे पत्र शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी काही तीन महिन्यांपूर्वी दिले होते. शिक्षण विभागात मोठा भ्रष्टाचार सुरू आहे. अधिकारी लाच घेताना पकडले जातात मात्र पुन्हा सेवेत येतात, पुन्हा भ्रष्टाचार करतात पण कारवाई होत नाही. त्यामुळे मांढरे यांनी थेट एसीबीकडे धाव घेतली होती. ज्या शिक्षकांवर छापे पडले त्यांची खुली चौकशी करण्याची मागणी मांढरे यांनी केली होती.

राज्यातील शिक्षण विभागाच्या कार्यालयात गेल्या काही वर्षांपासून भ्रष्ट कारभाराची कीड लागली आहे. शिक्षक बदल्यांसाठी अनेक अधिकारी आणि कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

शिक्षक बदलीच्या फायलीवर आर्थिक वजन ठेवल्यानंतर शिक्षकांना सोयीच्या जिल्ह्यात बदली झाल्याची अनेक प्रकरणे गेल्या काही वर्षात उघडकीस आली आहेत. शिक्षण विभागातील लाचखोरीला आळा घालण्यासाठी केवळ विभागीय चौकशी व निलंबन पुरेसे नसल्याने संबंधितांवर फौजदारी कारवाईच्या उद्देशाने शिक्षण आयुक्तांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला पत्र लिहिले होते. यामध्ये राज्याच्या शिक्षण विभागातील ४० प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ३३ प्रकरणांमध्ये 'एसीबी'ने आरोपपत्र दाखल केल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधान परिषदेत सांगितले. या ३३ अधिकाऱ्यांपैकी आठ अधिकारी नाशिक विभागातील असून, त्यांची चौकशी सुरू झाल्याची माहिती नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांनी दिली. येणाऱ्या काळात साधरणत: गेल्या पाच वर्षांत लाचखोरीमध्ये अडकलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी केली जाणार आहे. त्यामुळे शिक्षण विभागात गेल्या काही वर्षांत गैरप्रकार करून पुन्हा पदावर आलेल्यांना आता परत चौकशीला सामोरे जावे लागणार आहे. लाचखोरीत जे अधिकारी सापडले, त्यांच्याकडे कोट्यवधींचे घबाड सापडले आहे, ज्यात पैसा, जागा-जमीन अशा मालमत्ताही आहेत. नाशिक महापालिकेच्या शिक्षण विभागातील प्रशासनाधिकारी सुनीता धनगर यांच्या लाचखोरीमुळे गेल्या काही वर्षांतील शिक्षण विभागातील लाचखोरीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला.

ज्या ४० प्रकरणांच्या चौकशीसाठी पत्र पाठविले त्यांची चौकशी सुरू झाली असून, योग्य ती कारवाई होणार आहे. शिक्षण विभागाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड नष्ट करण्यासाठी अशी पावले उचलणे गरजेचे आहे. निलंबनानंतरच्या नियुक्ती नियमात बदल झाल्यास लाचखोरी नक्कीच कमी होईल. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.

-सूरज मांढरे, शिक्षण आयुक्त

पुनर्नियुक्तीचा नियम बदलणार?

निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुन्हा पदावर नियुक्ती मिळत असल्यामुळेच शिक्षण विभागातील लाचखोरी बोकाळल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे एखादा अधिकारी लाचखोरी किंवा अन्य कोणत्याही प्रकरणात निलंबित झाल्यास त्याला पुन्हा नियुक्ती देतानाच्या नियमात बदल करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे येथून पुढे शिक्षण विभागातील लाचखोरीला आळा बसण्याची शक्यता आहे.

खा. महास्वामींच्या जातीच्या दाखल्यावर ३ ऑगस्टला सुनावणी

सुराज्य/सोलापूर

भाजपचे सोलापूरचे खासदार डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी यांच्यासह चार जणांना जात पडताळणी समितीने पुन्हा नोटीस बजावली आहे. त्यावर पुढील महिन्यात म्हणजेच ३ ऑगस्टला सुनावणी होणार असल्याचे सांगण्यात आले.

महास्वामी यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबद्दल तक्रार करण्यात आली होती. खासदारांचे जात वैधता प्रमाणपत्र बनावट असल्याचे सांगून प्रमोद गायकवाड, अशोक ढोणे, आणि मुळे अशा तिघांनी जात पडताळणी समितीत धाव घेतली होती. यासंदर्भात जात पडताळणी समितीने एक दक्षता नेमले होते. त्या पथकाने महास्वामी यांच्या मूळगावी जाऊन तपास केला होता. कागदपत्रांच्या तपासणीनंतर खासदारांचे जात प्रमाणपत्र हे बनावट असल्याचा निकाल समितीने दिला होता.

जात पडताळणी समितीच्या निकालानुसार सोलापुरातील पोलीस ठाण्यात फसवणुकीचा (४२०) गुन्हा दाखल करण्यात आला होता. सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून चौकशीही करण्यात आली होती. मात्र, महास्वामी यांनी समितीच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयात बाजू मांडताना महास्वामी यांनी 'समितीने आम्हाला आमची बाजू मांडण्यासाठी पुरेशा कालावधी दिला नाही,' असे म्हणणे मांडले होते. त्यानंतर उच्च न्यायालयाने सोलापूरच्या जात पडताळणी समितीला महास्वामी यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पुन्हा चौकशी करावी. चौकशी करून आम्हाला अहवाल सादर करावा, असे निर्देश न्यायालयाने दिले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जात पडताळणी समितीकडून खासदारांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पुन्हा चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने समितीने महास्वामी यांच्यासह तिघांना नोटीस पाठविल्याचे सांगण्यात येते. आता खासदार हे सुनावणीला हजर राहतात का, याकडे लक्ष लागले आहे.

भाजप खासदाराच्या विजयाची जबाबदारी घेतली राष्ट्रवादीच्या आ.बबनदादांनी

सुराज्य/सोलापूर

माढा मतदारसंघातून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना आगामी लोकसभा निवडणुकीत दोन लाख मतांनी विजयी करू, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बबनराव शिंदे यांनी दिली आहे. निंबाळकर यांच्या विजयाची जबाबदारी आमदार शिंदे यांनी स्वीकारल्याची खमंग चर्चा मतदारसंघात सुरू आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे माढ्याचे आमदार बबनराव शिंदे आणि भाजप खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्यात चांगलेच राजकीय सूत जुळल्याचे दिसून येत आहे. त्यातूनच त्यांनी निंबाळकरांना थेट दोन लाख मतांनी निवडून आणण्याची भाषा केली आहे.

खासदार निंबाळकर यांच्या हस्ते आणि आमदार शिंदे यांच्या उपस्थितीत माढा विधानसभा मतदारसंघातील श्रीपूर ते खंडाळी या रस्त्याचे लोकार्पण शनिवारी झाले. त्यात कार्यक्रमानंतर आमदार शिंदे बोलत होते. वास्तविक, खासदार निंबाळकर हे मागील निवडणुकीत आमदार शिंदे यांचे बंधू तथा राष्ट्रवादीचे उमेदवार संजय शिंदे यांना पराभूत करून विजयी झालेले आहेत. त्या निवडणुकीत माळशिरस मतदारसंघातून विजयसिंह मोहिते पाटील यांनी निंबाळकर यांना एक लाखाचे मताधिक्य दिले होते. त्यावेळी आमदार शिंदे हे विरोधात होते. मात्र आता मोहिते पाटील यांचे राजकीय प्रतिस्पर्धी शिंदे यांचे निंबाळकर यांच्याशी राजकीय सूत जुळले आहे. दोन्ही शिंदे बंधू हे खासदार निंबाळकर यांच्या पाठीशी उभे राहणार, हे आता स्पष्ट झाले आहे. राज्यात नुकतेच अजित पवार गट भाजपसोबत गेल्याने ते नाते आणखी घट्ट झाले आहे. कारण दोन्ही शिंदे बंधू अजितदादांच्या गोटात सहभागी झाले आहेत. त्यातूनच आमदार बबनराव शिंदे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत निंबाळकर यांना विजयी करण्याची जबाबदारी घेऊन दोन लाखांचे मताधिक्य देण्याची ग्वाही दिली आहे. आमदार बबनदादा शिंदे यांनी केलेल्या या वक्तव्यांची संपूर्ण तालुक्यात दिवसभर चर्चा सुरू होती.

दोन लाख मताधिक्क्यांची दिली ग्वाही; मतदारसंघात खमंग चर्चा सुरु....

सख्या भावावर सत्तुरने हल्ला

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगर येथे जागेच्या वादातून सत्तुरने केलेल्या मारहाणीत सुरेश बसप्पा प्याटी (वय ४०) हे जखमी झाले. ही घटना शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. रात्री साडेबारा वाजता त्यांचा भाऊ सिध्दाराम प्याटी याने सत्तुरने भावाच्या डोक्यात मारले. जखमी अवस्थेत त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

सोलापुरातील बाराईमाम चौकात शनिवारी मोहरम उत्सवाची सांगता झाली. छोटे पंजे-बडे पंजे या दोन पंजाच्या भेटीचा अनुपम्य सोहळा पाहण्यासाठी असंख्य हिंदू-मुस्लिम बांधव उपस्थित होते. वृत्त पान ६ वर

दौंडमधून पाण्याचा विसर्ग घटला

सोलापूर : उजनी धरणात दौंड येथून येणारा विसर्ग कमी झाल्याने पाण्याची पातळी प्लसमध्ये जाऊ शकली नाही. शनिवारी सहानुसार दौंडमधून १३,९१८क्युसेकचा विसर्ग धरणात येऊन मिसळत होता. धरणातील पाण्याची पातळी वजा ६.९८ टक्के झाली आहे. दरम्यान खडकवासला कळमोडी धरणातून पाण्याचा विसर्ग थांबवण्यात आल्याचे सांगण्यात येते.बंडगार्डनमधून ९ हजार क्युसेकचा विसर्ग येत असल्याने रविवारी उजनीत पाण्याचा विसर्ग पुन्हा वाढेल. त्यानंतर सोमवारी किंवा मंगळवारी पाण्याची पातळी प्लसमध्ये जायला सुरुवात होईल.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

हा बोर्ड सरळ कोणी केला ?

कल्याण
789-40-668

रंगीबेरंगी फुलांच्या सुगंधात श्रीविठुराया रमला...

सुराज्य/पंढरपूर

अधिक मासानिमित्त शनिवारी पंढरीत कमला एकादशीचा सोहळा भक्तीभावाने पार पडला. पुरूषोत्तम मासाचा पर्वणीचा योग साधून अखंख्य भाविकांनी चंद्रभागेत स्नान करून श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले.

या सोहळ्याचे आचित्य साधून सावळ्या विठ्ठलाच्या गाभाऱ्याला रंगीबेरंगी फुलांची सजावट करण्यात आली होती. पुरषोत्तम मासातील एकादशी ही वारकरी संप्रदायासाठी पर्वणीचा काळ असते. त्याच पार्श्वभूमीवर पंढरीत दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. फुलांच्या सजावटीसाठी झेंडू, मोगरा, कामिनी, ब्ल्यू डीजे, टटिस, शेवंती, गुलछडी, गुलाब अशा विविध प्रकारच्या फुलांचा वापर करण्यात आला होता. विठ्ठल रुक्मिणी गाभारा वगळून चौखांबी, सोळखांबी, विठ्ठल आणि रुक्मिणी सभामंडप येथेही सजावट करण्यात आली होती. या सुगंधी फुलांच्या सजावटीमुळे विठ्ठल मंदिर सुगंधाने बहरुन गेले होते.



हा पुरुषोत्तम मास यावर्षी चातुर्मासाच्या कालावधीत येत असल्याने रोज यात्रेसारखी भाविकांची गर्दी असते. अशावेळी जास्तीत जास्त भाविकांना दर्शनासाठी वेळ मिळावा म्हणून महिनाभर रोजच्या ४५ तुळशी अर्चन पूजा बंद करण्याची मागणी भाविकांतून होत होती. आता मंदिराने रोजच्या ३० पूजा रद्द केल्याने भाविकांना दर्शनासाठी मिळणारा वेळ वाढणार आहे.

पर्वणी काळ

दर तीन वर्षातून येणार अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मास हा वारकरी संप्रदायाची पर्वणी काळ असतो. अधिक महिना सुरु झाल्यापासून शहरात रोज दोन लाखापेक्षा जास्त भाविक येत आहेत. यातच शनिवार आणि रविवार या जोडून सुट्ट्या आल्यावर हा आकडा तीन ते चार लाखांपर्यंत जात आहे. पुरुषोत्तम मासातील ही पर्वणी गाठण्यासाठी पाच लाखापेक्षा जास्त भाविक शनिवारी पंढरीत दाखल झाल्याचे सांगण्यात आले. विठुरायाच्या दर्शनाची रांग थेट गोपाळपूर येथील तिसऱ्या पत्राशेडपर्यंत गेली होती. रिमझिम पावसातही भाविक दर्शन रांगेत उभे होते.

छावणी चालकांची रखडलेली बिले व अडीअडचणी सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार : परिचारक

✔ सुराज्य/सांगोला

दुष्काळाच्या भीषण झळांनी शेतकरी पशुधन जगवताना मेटाकुटीला आला होता. अशा स्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सन २०१८ २०१९ मध्ये चारा छावण्या सुरू केल्या. यामुळे लाखमोलाचे पशुधन जगविण्यात शेतकरी यशस्वी झाला. मात्र, छावण्या बंद झाल्यानंतर छावणी चालकांची बिले शासनदरबारी रखडलेली आहेत. छावणी चालकांची रखडलेली बिले व अडीअडचणी सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून तात्काळ बिले देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे भाजपचे माढा लोकसभा निवडणुक प्रमुख तथा माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले.

सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणी चालकांनी सांगोला तहसील कार्यालयासमोर जनावरांसहित धरणे आंदोलन सुरू केले आहे. शनिवार दि. २९ जुलै रोजी भाजपचे माढा लोकसभा निवडणुक प्रमुख तथा माजी आमदार प्रशांत परिचारक, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी यांनी आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन छावणी चालकांच्या समस्या, अडचणी जाणून घेतल्या.

> छावणी चालकांनी भीषण दुष्काळात शेतकऱ्यांचे लाखमोलाचे पशुधन जगविले आहे. सांगोला आणि मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणी चालकांची बिले तात्काळ देण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे.
>
> - चेतनसिंह केदार सावंत, भाजप जिल्हाध्यक्ष.

२०१८-१९ च्या दुष्काळामध्ये सुरू करण्यात आलेल्या जनावराच्या छावण्याची देयकासाठी तब्बल अडीच वर्षांनंतरही राज्य सरकारने तरतूद केली नाही. छावण्या बंद करण्याच्या अंतिम टप्प्यात सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यातील जवळपास ३६ कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. जनावरे जतन करण्यासाठी उधारीवर घेतलेल्या चारा, पशुखाद्य व इतर खर्चाची देयके छावणी चालकांना देणेकराच्या दररोजच्या तगाद्यामुळे स्थानिक संस्था व बँकांची कर्जे काढून अदा करावी लागली. अशा परिस्थितीत सध्या तब्बल अडीच वर्षानंतर अडकलेले बिल मिळावे म्हणून छावणी चालकांनी सांगोला तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

थोडक्यात...

मानव उत्थान सेवा समितीच्यावतीने वृक्षारोपण अभियान कार्यक्रम

✔ **सोलापूर** : मानव उत्थान सेवा समिती, शाखा सोलापूरच्यावतीने शेळगी या विभागात वृक्षारोपण अभियान कार्यक्रम घेण्यात आला. मानव उत्थान सेवा समिती शाखा सोलापूरच्यावतीने ज्येष्ठ नागरिक अंजिलम्मा कुप्पागिरी व निर्मला रापेल्ली यांच्या हस्ते कुमारस्वामीनगर, शेळगी या विभागात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कैरी, सिताफळ आणि चिक्कू अशा विविध प्रकारची झाडे लावण्यात आले आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रमोहन चिप्पा, अंबादास तवटम, राजू रापेल्ली, अशोक कुप्पागिरी, जगदीश रापेल्ली, भावना संबारी व शाखाप्रमुख तिरुपती संबारी आदींनी परिश्रम घेतले.

आंतरिक शुद्धीसाठी ध्यान आवश्यक : अंबिका गाजूल

✔ **सोलापूर** : ध्यानामुळे आपल्या शरीरप्रणालीमध्ये बदल घडतात आणि शरीराच्या प्रत्येक कणात अधिक प्राणशक्ती भरली जाते. याचाच परिणाम म्हणजे आपल्याला अधिक आनंद व शांती मिळते आणि उत्साह वाढतो, असे प्रतिपादन अंबिका गाजूल (आर्ट ऑफ लिव्हिंग, सोलापूर) यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात संस्कृती मंत्रालयाच्यावतीने 'हर घर ध्यान' योजनेअंतर्गत आठ दिवसीय ध्यान शिबिर आयोजित करण्यात आले.

महाविद्यालयातील क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने ध्यानधारणा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या वेळी प्रा. डॉ. रजनी दळवी (क्रीडा विभाग प्रमुख), प्रा. डॉ. ॲनी जॉन (कार्यक्रमाधिकारी रासेयो), प्रा. डॉ. शंकर राजे (कार्यक्रमाधिकारी रासेयो) आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वयंसेवक श्रावणी सोमा, किरण वंगा, बालमणी यरगुंटला, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग सेलचे पदाधिकारी जाहीर

✔ **सोलापूर** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे खासदार शरद पवार गट सामाजिक न्याय विभागाच्या शहर मध्य सचिवपदी गणेश सोनवणे तर उपाध्यक्षपदी संगमेश खंडाळे, अतुल साळुंखे यांची रविवारी निवड झाली. राष्ट्रवादी पवार गटाचे शहराध्यक्ष भारत जाधव यांनी सामाजिक न्याय विभागातील पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र दिले. शहर राष्ट्रवादी भवनात हा कार्यक्रम झाला. यावेळी सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष अजित पात्रे, मध्य विधानसभा अध्यक्ष सुनील कोंजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या सहसचिवपदी मंगेश लोंढे, सदस्यपदी अमोघ व्हनसुरे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या इतर सेलच्या पदाधिकाऱ्यांची लवकरच निवड होईल, असे भारत जाधव यांनी सांगितले.

इंडियन दलित सेनेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

✔ **सोलापूर** : इंडियन दलित सेनेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान सोहळा सोलापूर येथील समाज कल्याण केंद्र, रंगभवन चौक येथे झाला. सदर कार्यक्रमास ६० टक्क्यांपेक्षा जास्त मार्क असणारे बहुसंख्य विद्यार्थी, पालक व संघटनेचे पदाधिकाऱ्यांच्या व ज्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला ते प्रमुख अतिथी राष्ट्रवादीचे प्रमुख नेते सुधीर खरटमल, समता सैनिक दलाचे प्रमुख केरु जाधव, आरपीआयचे अभिजित तिरते यांच्या प्रमुख उपस्थितीत व संघटनेचे संस्थापक देविदास दुपारगुडे यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कृष्णा जटार यांनी केले.

'राष्ट्रीय जलतरण'मध्ये वंशिका हिला एक रौप्य व एक कांस्य पदक

✔ **सोलापूर** : भारतीय जलतरण महासंघाच्यावतीने चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या ३९वी सब ज्युनिअर व ४९वी ज्युनिअर राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत केंद्रीय विद्यालय, सोलापूर येथे इयत्ता ८वीमध्ये शिकत असलेली वंशिका चुंगीवडियार हिने सबज्युनिअर वयोगटातून हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य व १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग प्रकारात तृतीय क्रमांक मिळवत कांस्य पदक पटकाविले. या अगोदर १ व २ जुलै २०२३ रोजी दादर (मुंबई) येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत वंशिका हिने दोन सुवर्ण व एक कांस्य पदकाची कमाई केली होती. या स्पर्धेतूनच तिची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली होती. राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत पदक प्राप्त केल्यावर केंद्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत कुलकर्णी, प्रदेश काँग्रेस सरचिटणीस भिमराव बाळगे, क्रीडा शिक्षक अकील शेख यांनी अभिनंदन केले आहे. वंशिका हिस जलतरण प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. हेमंत आळंगे यांना पीएचडी प्रदान

✔ **सोलापूर** : प्रा. हेमंत संगप्पा आळंगे यांना स्वामी रामानंदतीर्थ मराठा विद्यापीठ नांदेड, विद्यापीठाकडून कॉमर्स विषयामध्ये पीएचडी पदवी प्रदान करण्यात आले आहे. 'फायनान्शियल परफॉर्मन्स ऑफ पेंट इंडस्ट्री इन इंडिया' या विषयावर त्यांनी शोधनिबंध सादर केला आहे. शिवाजी महाविद्यालय रेणापूर, जिल्हा लातूर येथील प्रा. डॉ. पी. टी. पवार, डॉ. गीता आळंगे, प्रा. नीता आळंगे, ॲड. राजशेखर आळंगे व सीए महेश आळंगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

स्व. संभाजीराव शिंदे यांची पुण्यतिथी साजरी

✔ सुराज्य/सोलापूर

संभाजीराव शिंदे विद्या मंदिर, विडी घरकुल संकुल, सोलापूर येथे स्व. संभाजीराव शिंदे यांची ७६वी पुण्यतिथी पितृदिन म्हणून साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका, प्रशालेचे मुख्याध्यापक वासुदेव इप्पलपल्ली, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तनुजा मारपल्ली, पर्यवेक्षक सतीश मल्लाव, ज्युनिअर महाविद्यालयाच्या विभागप्रमुख नवनाथ व्हटकर हे लाभले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्व. संभाजीराव शिंदे आणि संस्थेचे आधारस्तंभ स्व. विष्णुपंत कोठे यांच्या प्रतिमा पुजनाने झाली.

हा कार्यक्रम पितृदिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना पित्याचे आपल्या जीवनातील स्थान व महत्व सांगितले. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या डॉ. राधिका चिलका यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन दत्तात्रय नरुटे यांनी केले तर आभार करुणा जामदार यांनी मानले.

अधिकमास पौर्णिमेनिमित्त अमृतानंद स्वामीजींचे प्रवचन

✔ सुराज्य/सोलापूर



हिंदू धर्मामध्ये अधिकमासाला अनन्य साधारण महत्व आहे. अधिकमास पुरुषोत्तम मास या नावानेही ओळखले जाते. या पुण्यकाळात पुराण, प्रवचन, सत्संग, दानधर्म, तीर्थयात्रा केल्याने अधिक पुण्य प्राप्ती होते असे शास्त्र सांगते. या अधिकमासाचे औचित्य साधून अधिक मास पौर्णिमेनिमित्त साधना कुटी परिवार, भंडारकवठे व श्री गुरुदेवदत्त मंदिर सत्संग मंडळ, आनंदनगर येथे १ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता श्री दत्त मंदिर, आनंदनगर येथे प. पू. श्री. सिद्धेश्वर महास्वामीजींचे परमशिष्य योगगुरु डॉ. प. पू. श्री. अमृतानंद महास्वामीजी श्री गुरुदेव आश्रम बालगाव यांच्या अध्यक्षतेखाली व वेदमूर्ती पू. श्री. महांतेशस्वामीजी हिरेमठ, श्री चंद्रशेखर संस्थान मठ तद्देवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सत्संग कार्यक्रमात प. पू. श्री. सिद्धेश्वर महास्वामीजींच्या सातव्या मासिक स्मृतिप्रीत्यर्थ श्री समर्थ ॲग्रो सर्व्हिसेस प्रो. श्री. एस. के. बिराजदार आनंदनगर यांच्यावतीने १०० वृक्षांची लागवड भंडारकवठे, बाळगी, सादेपूर, माळकवठे, निंबर्गी, विंचूर, कंदलगाव, वडापूर, आंत्रोळी, कुसूर, खानापूर, तेलगाव या गावातील प्रतिष्ठीत नागरिक व प्रमुख सत्संग मंडळींच्या हस्ते करण्याचे आयोजिले असून याप्रसंगी श्री ज्ञानेश्वर माऊली भजन मंडळ, वडापूर येथील बालगोपाळांच्या सुश्राव्य भजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सत्संग कार्यक्रमात आपण येऊन आपल्या हस्ते वृक्ष लागवड करुन पुण्यप्राप्ती करुन घ्यावी, असे आवाहन साधना कुटी सत्संग परिवार भंडारकवठे व श्री दत्त मंदिर सत्संग मंडळाने केले आहे.

दिलीपराव माने यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रकला स्पर्धा

✔ सुराज्य/सोलापूर

नीलमनगर भाग ३ व ४ येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, अल्पसंख्यांक पंजीकृत संस्था आशा मराठी विद्यालय व श्री धर्मण्णा सादूल प्रशालेत माजी आमदार दिलीपराव माने यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै रोजी भव्य चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन जयश्री माने, शिरीष जाधव, भीमाशंकर म्हेत्रे, अजित महावरकर, मुख्याध्यापिका तस्लीम पठाण व मुख्याध्यापक सय्यद आफरीन, संस्थेचे अध्यक्ष हरुण पठाण, उपाध्यक्ष आसिफ पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. इयत्ता १ली ते इयत्ता १० वी अशा गटांमध्ये रंगभरण स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. एकूण ११७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या सहभाग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. मान्यवरांचा सत्कार संस्थेच्यावतीने करण्यात आला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी वाढदिवस गौरव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले. कला शिकि धारेराव यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार राम गायकवाड यांनी केले.

वधू-वर मेळाव्यात १०० जणांचे लग्न जमले

✔ सुराज्य/सोलापूर

केवळ बागबान समाज नव्हे तर मुस्लीम धर्मातील जाती-जमातीतील वधू-वर परिचय मेळाव्यात ५०० इच्छुक वधु-वरांनी सहभाग नोंदविला. यातील १०० जणांचे लग्न मेळाव्यातच जमल्याचे ट्रस्टचे प्रमुख नजाकतअली मंद्रुपकर यांनी सांगितले. पहिले दोन मेळावे यशस्वी झाल्यावर तिसऱ्या मेळाव्यास महाराष्ट्रासह कर्नाटकातील मंडळींकडून उत्स्फूर्त व भरघोस प्रतिसाद मिळाला.

या मेळाव्यात सोलापूरसह मुंबई, पुणे, कोल्हापूर, फलटण, कराड, औरंगाबाद, इंदापूर, विजापूर, अहमदनगर, नांदेड, सांगली, सातारा, बीड, लातूर, उस्मानाबाद, गुलबर्गा येथून आलेल्या इच्छुक वधू-वर आणि त्यांच्या पालकांनी मेळाव्याच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक केले. या मेळाव्यात बागबान, काझी, शेख, सय्यद, मोमीन, नदाफ, मुजावर, पठाण, खान, तांबोळी, कुरेशी, बक्करकुरेशी, मुर्शद, जमादार, मकानदार, अत्तार, मुल्ला, मनियार, पटवेगर आदी समाजातील इच्छुक वधू-वर आणि त्यांच्या पालकांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष नजाकतअली मंद्रुपकर यांनी सांगितले की, 'बागबान चॅरिटेबल ट्रस्ट केवळ एका समाजासाठी कार्यरत नाही तर सर्वच जाती-जमाती, पोटजातींना एकत्र येऊन काम करत आहे. वधू-वर पालक परिचय मेळावा हा त्याचा एक भाग आहे. वधू-वर मेळावा घेण्यामागील लोकांचा पैसा अन् वेळ वाचविणे हाच ट्रस्टचा उद्देश आहे.'

या मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून शहर काझी अमजदअली सय्यद होते तर अध्यक्षस्थानी नसीरअहमद खलीफा हे होते. यावेळी मुनाफ चौधरी, मुस्ताक चौधरी, जुबेर कुरेशी, साहिल रामपुरे, शब्बीर रामपुरे, मंजूर, मैनोद्दिन चेअरमन, कलीम तुळजापुरे, इब्राहिम मैंदर्गीकर, मौला तुळजापुरे, शौकत पठाण आदी उपस्थित होते. प्रारंभी रियाज बागबान यांनी प्रास्ताविक केले. ट्रस्टचे अध्यक्ष नजाकतअली मंद्रुपकर यांनी आभार मानले.

निलगार ज्ञाती संस्थेच्या अध्यक्षपदी रवींद्र चवडेकर

✔ **सोलापूर** : निलगार ज्ञानी या संस्थेची सभा सुनील मल्लप्पा मुनकमपल्ली यांच्या अध्यक्षतेखाली होऊन सन २०२३-२४ या सालाकरिता पुढील पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

अध्यक्ष रवींद्र चवडेकर, उपाध्यक्ष श्रीनिवास चिंतनपल्ली, सेक्रेटरी मल्लिकार्जुन गोगी, जॉईंट सेक्रेटरी दयानंद अल्लोळी, श्रीनिवास आडकी. याप्रसंगी ट्रस्टी नारायण काळपगार, समस्त कार्यकारी मंडळ, अध्यक्ष, पंच आदी सदस्यगण उपस्थित होते.

संत काशिबा महाराज आर्थिक महामंडळास शासनाची मान्यता

✔ **सोलापूर** : गुरव समाजाचे आधारस्तंभ आणि धुरंदर नेतृत्व आमदार विजयराज शिंदे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष समाजाचे धडाडीचे नेतृत्व मल्लिकार्जुन गुरव यांच्या प्रचंड प्रयत्नामुळे आणि समस्त महाराष्ट्र आणि आजूबाजूच्या राज्यातील गुरव समाज बांधवांच्या उपस्थितीने, सोलापूर जिल्हा आणि स्थानिक समाज बांधवांच्या साथीने यशस्वी झालेल्या अधिवेशनामुळे संत काशिबा महाराज आर्थिक युवा विकास महामंडळ मिळाल्याबद्दल आणि २१ जुलै रोजी ५० कोटींची तरतूद करुन कॅबिनेटमध्ये मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या सरकारचे अभिनंदन करण्याचा ठराव नुतन सोलापूरचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना देण्यात आले.

याप्रसंगी समाज महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव, प्रदेश कार्यकारणी सदस्य चंद्रकांत गुरव, म. प्र. कोषाध्यक्ष बसवराज, सो. जि. अध्यक्ष निंगराज विंचुरे व पदाधिकारी उपस्थित होते.

बुर्ला महिला महाविद्यालयात नॅपकीन बुके प्रशिक्षण शिबीर

✔ सुराज्य/सोलापूर

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला वरिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी संघटना व माऊली नॅपकीन बुके केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय नॅपकीन बुके प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन माऊली नॅपकीन बुके केंद्राचे मुख्य ज्ञानेश्वर म्याकल ज्येष्ठ पत्रकार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी होते.

या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर म्याकल म्हणाले की, 'या शिबिराद्वारे विद्यार्थिनींना स्वावलंबनाचे व रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. 'कमवा आणि शिका' या उक्तीप्रमाणे विद्यार्थिनी स्वत:चे व्यक्तीमत्व उत्तमप्रकारे घडवू शकतात. आजकाल पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवसायाभिमुख शिक्षण घेणे महत्वाचे आहे. त्यासाठी हे प्रशिक्षण शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असेही प्रतिपादन त्यांनी या कार्यक्रमाप्रसंगी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी म्हणाले की, 'विद्यार्थिनींना कोणत्याही कामाला कमी न लेखता निष्ठेने केल्यास त्यात यश मिळते. त्यासाठी विद्यार्थिनींनी प्रशिक्षणात सहभाग नोंदवून आपला विकास करावा, अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या वेळी प्रा. डॉ. ॲनी जॉन (आयक्यूएसी), प्रा. डॉ. रजनी दळवी (समन्वयक, माजी विद्यार्थिनी संघटना), प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. सविता मल्लाडे, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

पालकांनी पाल्याशी संवाद साधणे गरजेचे : देशमुख

✔ सुराज्य/नातेपुते

मुलांच्या गुणवत्तेकडे पालकांसह शिक्षकांनी लक्ष देऊन मुलांना व्यसनांपासून, मोबाईलपासून दूर ठेवावे तसेच वाचन, लेखन याकडे लक्ष द्यावे, असे मत नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धैर्यशील देशमुख यांनी व्यक्त केले.

नातेपुते येथील डॉ. बा. ज. दाते प्रशालेत आयोजित पालक शिक्षक सभेत ते बोलत होते. प्रारंभी व्यासपीठावरील सरस्वती, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना धैर्यशील देशमुख म्हणाले, 'धावपळीच्या जगामध्ये पालकांना आपल्या पाल्याकडे व पाल्याच्या शिक्षकांकडे देण्यासाठी पालकांकडे पुरेसा वेळ उपलब्ध नसल्याने अनेक समज-गैरसमज निर्माण होत आहेत. पालक, पाल्य व शिक्षकांचे नाते घट्ट व्हावे, मोबाईलमुळे जग जवळ असल्यासारखे वाटत असले, तरी पाल्यांच्या मानसिकतेवर परिणाम होताना दिसत आहे. त्यामुळे पालकांनी जास्तीत जास्त पाल्यांशी संवाद साधणे गरजेचे आहे.' यावेळी पालकांनी शाळेच्या विविध उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले. पालकांच्या तक्रारींचे संस्थेने, मुख्याध्यापकांनी निराकरण केले.

यावेळी पालक सभेस चेअरमन धैर्यशील देशमुख, व्हा. चेअरमन संतोष काळे, नंदन दाते, मुख्याध्यापक विठ्ठल पिसे, उपमुख्याध्यापक स्नेहल कुलकर्णी, पर्यवेक्षक दत्तात्रेय यादव, विनायक देशपांडे, संजय उराडे, राहुल पद्मन, विकास काळे, सारिका जगताप आदी मान्यवर तसेच पालक, शिक्षक उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७७५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

जिल्हाधिकाऱ्यांसह प्रशासन जाणार ग्रामीण भागात घरोघरी

प्रलंबित प्रकरणाचा निपटारा, युवा संवाद, दररोज गावपातळीवर लाभार्थींना करणार एकत्र

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हामध्ये १ ते ७ ऑगस्ट महसूल दिन साजरा करणार आहे. या कालवधित ग्रामिण भागावर लक्ष केंद्रीत सात दिवसात प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यास प्राधान्य देत महसुल विभागाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सेवा तसेच योजनाची माहिती देत. नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत करण्यासाठी जिल्हाधिकारीसह उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, तलाठी हे ग्रामीण भागात घरोघरी जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांची पत्रकार परिषदेत माहिती

१ ऑगस्ट रोजी जमीन महसूल अधिनियम कलम १५५ खालील ई- हक्क पोर्टलवरील प्रलंबित प्रकरणे तलाठयामार्फत निकाली काढणेची कार्यवाही करण्यात येणार आहे. २ ऑगस्ट २०२३ रोजी युवा संवाद योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कारणासाठी आवश्यक दाखले व प्रमाणपत्रांचे तत्काळ महाविद्यालय स्तरावर वितरण करण्यासाठी प्रांताधिकारी, तहसीलदार, तलाठी कॉलेज, शाळेमध्ये जाऊन युवा संवादाच्या माध्यमातून शिक्षणासाठी लागणारे दाखले वितरण करणार आहेत.

३ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा या अतर्गंत मान्सुन पुर्व व मान्सुन कालावधीत अवकाळी पाऊस,अतिवृष्टी, पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना देय असलेल्या सोई सुविधा, नुकसान भरपाई देण्याबाबत सर्व प्रशासन गावागावा जाणार आहे. पिक विमा असो इतर दाखले तलाठी पातळीवर दिले जाणार आहेत. ४ ऑगस्ट रोजी जनसंवाद कार्यक्रमार्तंगत महसूल अदालतींचे आयोजन करुन सर्व स्तरावरील अपिले निकाली काढण्यात येणार आहेत. सलोखा योजनेंतर्गत गावा-गावांतील व शेतातील रस्त्यांबाबत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिबिर घेतले जाणार आहे. ५ ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी या कार्यक्रमार्तंगत सैनिकांच्या विविध अडीअडचणींबाबत आढावा घेऊन तातडीने निराकरण येईल तसेच जमिनीचे तंटे, प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील. ६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील महसूल संवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांची प्रलंबित सेवाविषयक प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. ७ ऑगस्ट रोजी महसूल विभागामार्फत महसूल सप्ताह निमित्त येतलेल्या विविध उपक्रमांबाबतची फलनिष्पत्ती व विशेष उल्लेखनीय कामकाजाची दखल घेण्यासाठी महसूल सप्ताहाचा सांगता केली जाणार आहे.

सात दिवसात गाव पातळीवर प्रत्येक सर्व लाभार्थ्यांना एकत्र करुन लाभ घेतलेल्या दाखल, प्रमाणपत्रचे वितरण तहसिलदार, मंडलअधिकारी, तलाठी यांच्या माध्यमातून वितरण केले जाणार आहे. यासाठी सात दिवस जिल्हाप्रशासनातील सर्व अधिकारी ग्रामिण भागात घरो घरो जाणार आहेत. आपण स्व:ता देखिल सात दिवस विविध भागात जाणार असल्याचे जिल्हाधिकारी आर्शीवाद यांनी दिली.

बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जून मंदिरात अधिक मासानिमित्त श्री शिवयोगी सिध्देश्वर चरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात सहभागी झालेल्या महिला.

दर्गनहळळी येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : दर्गनहळळी (ता.दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या शिवराज नामदेव नरळे (वय ३१) याने मामाच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना काल शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. शिवराज नरळे याने त्याच्या मामाच्या घरातील वरच्या मजल्यावर असलेल्या छताच्या पाईपला दोरीने गळफास घेतला होता . त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णांना दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला . या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही .

क्राईम रिपोर्टर असोसिएशनच्या अध्यक्षपदी अमोल व्यवहारे तर सचिवपदी अरूण रोटे

सुराज्य/सोलापूर

सोलापूर क्राईम रिपोर्टर असोसिएशनच्या सन २०२३-२४ च्या अध्यक्षपदी अमोल व्यवहारे (दै. पुढारी) यांची तर सचिवपदी अरूण रोटे (दै. तरूण भारत संवाद) यांची निवड करण्यात आली.

क्राईम रिपोर्टर असोसिएशन, सोलापूर संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी जेष्ठ क्राईम रिपोर्टर अखलाक शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामध्ये नुतन पदाधिकारी निवडण्यात आले. निवडण्यात आलेले पदाधिकारी पुढीलप्रमाणे:

अध्यक्ष :अमोल व्यवहारे (दै. पुढारी), उपाध्यक्ष : रजनीकांत उपलंची, भरतकुमार मोरे (दै. पुण्यनगरी), सचिव : अरूण रोटे (दै. तरूण भारत संवाद), खजिनदार : मुकुंद उकरंडे, सहसचिव : रूपेश हेळवे (दै. लोकमत), मुन्ना शेख (दै. जनसत्य), कार्यकारिणी सदस्य : विनायक होटकर (दै. तरूण भारत), परशुराम कोकणे, इरफान शेख (म.टा. ऑनलाईन), रोहन नंदाने (दै.सुराज्य), रत्नदीप सोनवणे, तात्या लांडगे (दै.सकाळ), मुइझमिल शहानूरकर (बी.आर. न्यूज), संताजी शिंदे (दै.लोकमत), रमेश पवार (दै. दिव्य मराठी), मार्गदर्शक : अखलाक शेख, अनिल कदम, धनंजय मोरे, संजय जाधव, विजयकुमार राजापुरे, सरदार अत्तार, विलास जळकोटकर.

सावळेश्वर येथील दोन महिलांना अन्नातून विषबाधा

सोलापूर : सावळेश्वर (ता. मोहोळ) येथे अन्नातून विषबाधा झाल्याने दोघा महिलांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोनाली तानाजी ऊराडे (वय ३५) आणि रेखा विलास गाडेकर (वय ३६ दोघी रा. सावळेश्वर) अशी विषबाधा झालेल्या महिलांची नावे आहेत. त्या दोघींनी काल सायंकाळी स्वतःच्या शेतात फवारणी केलेल्या मेथीची भाजी खाल्ली होती. त्यांना उलट्या जुलाब झाल्याने मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून रात्री सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

रोटरी तर्फे न्या. लळीत यांचे मंगळवारी व्याख्यान

सुराज्य/सोलापूर

रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या तर्फे दरवर्षी प्रमाणे माजी कुलगुरु व रोटरीचे प्रांतपाल के. भोगीशयना यांच्या स्मरणार्थ व्याख्यान आयोजित केले जाते. यावर्षी माजी सरन्यायाधीश उदय लळीत राईट टु एज्युकेशन अँड सुप्रिम कोर्ट' (शिक्षणाचा अधिकार आणि सुप्रिम कोर्ट) या विषयावर इंग्रजीतून व्याख्यान देतील. हे व्याख्यान मंगळवार १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता कल्पना टॉकीजजवळील गुजरात भवनच्या वातानुकूलीत सभागृहात होत असल्याची माहिती अध्यक्ष रोटे. डॉ. ज्योती चिडगुपकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रा. के. भोगिशयना हे सोलापुरातील संगमेश्वर महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. १९६० मध्ये ते या महाविद्यालयाचे प्राचार्य झाले आणि १९८३ पर्यंत म्हणजे सलग २३ वर्षे त्यांनी प्राचार्यपदाची धुरा समर्थपणे सांभाळली आणि शिक्षण क्षेत्रात कुशल प्रशासक आणि व्यासंगी प्राध्यापक म्हणून आपला ठसा उमटवला. शिक्षणाबरोबरच शिस्त, चारित्र्य आणि मूल्यांवरची श्रद्धा या गुणांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये व्हावा यासाठी ते अविरत प्रयत्नशील राहिले. रेडक्रॉसच्या

व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, रोटरी क्लबचे प्रांतपाल, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष, कोल्हापूरच्या सायबर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, सोलापूरातील श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य पाहिले. अशा विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. १९७२ मध्ये अलाबमा (युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका) येथे गेलेल्या रोटरीच्या अभ्यासगटाचे नेतृत्त्व त्यांनी केले होते.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर तर्फे भोगीशयना यांच्या स्मरणार्थ गेल्या १९ वर्षांपासून विविध विषयांवर तज्ञ व्यक्तींची इंग्रजीमध्ये व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. आजपर्यंत टाईम्स् ऑफ इंडियाचे माजी संपादक - स्व. दिलीप पाडगांवकर, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु - डॉ. नरेंद्र जाधव, शास्त्रज्ञ अनिल काकोडकर, डॉ. पंडित विद्यासागर, प्रकाश बंग, महाभोक्ता ड. आशुतोष कुंभकोणी, न्यायमुर्ती अजित शाह, डॉ. एन. एम. कोंडप, रोटरीचे आंतरराष्ट्रीय माजी अध्यक्ष राजा साबू, कल्याण बॅनर्जी, रेखा शेट्टी, यतीन शहा आदी वक्त्यांचे विचार ऐकण्याचा लाभ सोलापूरकरांना मिळाला असल्याचे डॉ. राजीव प्रधान यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस सचिव विद्या मणुरे, सीए राजगोपाल मिणियार, खजिनदार अलोक गुप्ता सह विशाल वर्मा, माजी अध्यक्ष जयेश पटेल, सुहास लाहोटी, शिवाजी उपरे, निलेश फोफलिया आदी उपस्थित होते.

शोभा देवी नगरात महिलेस मारहाण

सुराज्य/सोलापूर

नईजिंदगी परिसरातील शोभादेवी नगरात भांडण सोडविण्यास गेल्यानंतर लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत निकहत मोहसीन खान (वय २२ रा. शोभादेवी नगर) ही महिला जखमी झाली . ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास दौला कुमठे याच्या ऑफिस जवळ घडली. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . सैपनबी, सोहेल मुजावर, अफजला मुजावर, मोबीन खान आणि अन्य दोघे ६ सहा जणांनी मिळून मारहाण केली . अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे .

संभाजी ब्रिगेड दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी शेखर चौगुले

सुराज्य/सोलापूर

संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी कासेगाव येथील शेखर चौगुले यांची निवड करण्यात आली निवडीचे पत्र संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी राजमुद्रा फायनान्स सर्विसेस चे उद्घाटन श्याम कदम यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी युवकांनी उच्च शिक्षण घेऊन उद्योजक बनावे व आर्थिक सक्षमीकरण यावर भर द्यावे असे मनोगत व्यक्त केले यावेळी संभाजी ब्रिगेडचे उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष बाबासाहेब ननवरे जिल्हा उपाध्यक्ष नागेश पवार श्री दिलीपराव चौगुले- संस्थापक, नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण प्रसारक मंडळ. श्री बालाजी चौगुले - चेअरमन - शंभूमुद्रा पतसंस्था, कासेगाव. यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कासेगाव येथील लान्स नायक शहीद जवान शिवराम चौगुले यांच्या स्तंभास अभिवादन करण्यात आले.

यावेळी शंकर येनगुरे संजय जाधव प्रवीण चौगुले विठ्ठल काटकर विक्रम मिटकरी राजाभाऊ वाडकर लखन गायकवाड सुनील शिंदे, रणजित चौगुले अजित चौगुले विश्वजीत चौगुले प्रदीप माने केशव चौगुले विजय चौगुले ज्ञानेश्वर कदम प्रदीप माने सुनील शिंदे सोहेल शेख आनंद शिंदे गणेश गरड राम जाधव इंद्रजित देवाने सचिदानंद चौगुले गणेश पांगरकर प्रफुल्ल पाटील आदी उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर ईस्ट च्या अध्यक्षपदी आनंद लोणावत तर सचिवपदी सचिन जोशी

सुराज्य/सोलापूर

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या सोलापूर येथील रोटरी क्लब ऑफ सोलापूर ईस्ट च्या अध्यक्षपदी प्रसिद्ध उद्योजक आनंद लोणावत यांची तर सचिव पदी सचिन जोशी यांचे निवड करण्यात आली सन २०२३ ते २०२४ या कालावधीत त्यांचा कार्यकाल असणार आहे.

सोलापूर येथील गुजराती भवन मध्ये डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नोमिनी सुधीर लातूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेमध्ये वरील निवड करण्यात आली यावेळी असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन जयंत हरिदास , सोलापूर विकास मंचचे केतन शहा, जैन मंदिराचे ट्रस्ट इंदरमल जैन यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी बोलताना आनंद लोनावत म्हणाले की %६ वर्ष पूर्ण होत आहेत भारताला स्वातंत्र्य मिळून या निमित्ताने %६ किलोमीटर धावणे मॅरेथॉन स्पर्धा ते आयोजित करण्याचा संकल्प केलेला आहे लिमका बुक्स ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यामध्ये त्यांनी नाव नोंदणी देखील केली असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

तसेच सोलापूर शहर परिसरात सहा हजार झाडांची लागवड करणार आहेत. या कामी त्यांना सर्व रोटेरियन सहकार्य करणार आहेत.बंकलगी , होटगी आणि औज येथील गावामधून मोती बिंदू ऑपरेशन्स रोटरी कडून मोफत करणार असल्याचे आनंद लोणावत यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्तावना सुनील अग्रवाल यांनी केला , सूत्रसंचालन अहमद शेख यांनी केले तर आभार नूतन सचिव सचिन जोशी यांनी मानले. यावेळी दत्ता मुळे, महादेव कोगनुरे, संजय शहा, मेघशाम येमुल, प्रशांत उमरे, जयेश भाई पटेल, राजन व्होरा, अभय सुराणा आदी मान्यवरांसह मोठ्या प्रमाणात रोटेरियन उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर सोलापूर दौऱ्यावर

अक्कलकोट येथे ७ ऑगस्ट रोजी जाहीर जन आक्रोश सभेचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर व जिल्हा तसेच अक्कलकोट तालुक्याच्यावतीने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे सोमवार दि. ७ ऑगस्ट रोजी सोलापूर दौऱ्यावर येत असून, दुपारी एक वाजता अक्कलकोट येथे जाहीर जाहीर जन आक्रोश सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष श्रीशैल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अक्कलकोट येथे जाहीर सभेमध्ये भारतात मणिपूर राज्यातील घटना आणि महाराष्ट्रात दलित, आदिवासी, मुस्लिम आणि इतर अल्पसंख्याक समाजावर वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या अन्याय व प्रचाराच्या विरोधात व संविधान बचाव असे अनेक विषय घेऊन ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर व जिल्हा अक्कलकोट तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आक्रोश जाहीर सभा घेत आपले विचार मांडणार आहेत. महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून आवाज उठवत आहेत. त्याच पद्धतीने अक्कलकोट येथील अनेक अशा घटना घडलेल्या आहेत, अशा घटना पुन्हा भविष्यात होऊ नये व कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी बाळासाहेब आंबेडकर भाषण करणार आहेत. तरी सोलापूर शहर व जिल्ह्यातील वंचित घटकांनी अक्कलकोट येथे होणाऱ्या सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष गायकवाड यांनी केले आहे.

श्वान घुटमळत घुटमळत नाल्यापाशी गेले, दागिन्यांच्या रिकाम्या बॉक्सचा सुगावा लागला

वळसंग सोन्या चांदीचे चोरी प्रकरण; चोर शोधण्यासाठी पोलिसांची सात पथके रवाना

सुराज्य/अक्कलकोट

वळसंग (ता. द. सोलापूर) येथे पांडुरंग ज्वेलर्स मधील सोन्या चांदीच्या दागिन्या सह रोख रक्कमेची चोरी झाली. चोरीचा प्रकार समोर आल्यानंतर सोलापूर ग्रामीण पोलीसांचे डॉग स्कॉड घटना स्थळी पोहोचले,डॉग स्कॉड मधील श्वान हे घुटमळत घुटमळत ज्वेलर्स परिसरातील पाठीमागे असलेल्या नाल्याजवळ गेले. त्याचवेळी पोलीसांना ज्वेलर्स चे रिकामे बॉक्स सापडले.सोन्याचे दुकान फोडून सोन्या-चांदीचे दागिने लुटणाऱ्या चोरट्यांचा महाराष्ट्रासह कर्नाटकात पोलिसांच्या सात पथकाकडून शोध युध्दपातळीवर सुरू आहे.

दरम्यान वळसंग येथील बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर यशवंत महारुद्र चाकूर यांचे पांडुरंग ज्वेलर्स हे सोन्याचे दुकान आहे. अज्ञात चोरट्यांनी हे दुकान फोडून ६६ तोळे सोने व २६ किलो चांदी असे एकूण ३७ लाख ८९ हजार रुपयांचे दागिने चोरले. मंगळवारी रात्री यशवंत चाकूर हे दुकान बंद करून ते घरी गेले. रात्री एकनंतर अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे चॅनलचे गेट कटावणीने तोडले. त्यानंतर शटरचे कोयंडा तोडून त्यांनी दुकानात प्रवेश केला. दुकानात विक्रीसाठी विविध ट्रेमध्ये ठेवलेले सोन्याचे व चांदीचे दागिने काढून घेतले. तसेच चाकूर यांची पत्नी महानंदा यांचे वापरातील सोने व ड्रॉवरमध्ये ठेवलेले एक लाख रुपयेही चोरले होते. वळसंग गावातील आजपर्यंतची सर्वात मोठी चोरी होऊन तीन दिवस उलटले तरी पोलिसांना अद्याप धागेद्वारे हाती लागले नाहीत.

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे ,अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार, वळसंग चे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी घटनास्थळाला भेट दिली होती.त्यानंतर तपास वेगाने सुरू झाला.ज्वेलर्स परिसरात असलेले सीसी टिव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले जात आहेत. डॉग स्कॉड मधील श्वान ज्वेलर्सच्या पाठीमागे असलेल्या नाल्याजवळ घुटमळत घुटमळत गेल्या नंतर रिकामे बॉक्स पोलिसांना दिसून आले.

महाराष्ट्रसह कर्नाटक सीमावर्ती भागात करणार तपास

ज्वेलर्स मधील चोरीची घटना घडली, त्यानंतर पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांच्या मार्गदर्शनाखाली युध्दपातळीवर चोर शोधण्यासाठी या चोरीच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक, वळसंग चे तीन पथक, अक्कलकोट दक्षिण व उत्तर पोलीस ठाण्यातील पोलिसांची प्रत्येकी एक पथके असे एकूण सात पथके तयार करण्यात आली आहेत.ही पथके महाराष्ट्र सह कर्नाटक सिमावर्ती भागासह अन्य ठिकाणी चोर शोधण्याची मोहीम वेगाने सुरू आहे.लवकरच चोर जेरबंद होतील. अशी माहिती तपास अधिकारी वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी दिली आहे.

करमाळा तालुका शंभर टक्के बागायत होण्यासाठी कुकडी-उजनी योजना राबिणार : आ. संजय शिंदे

✔ सुराज्य/सोलापूर

करमाळा तालुका शंभर टक्के बागायत होण्यासाठी उजनी-कुकडी योजना आपण राबविणार असून त्यासाठी पाटबंधारे विभागाने हिरवा कंदिल दिला असल्याची माहिती आमदार संजय शिंदे यांनी दिली.

आ. शिंदे म्हणाले की उजनी-कुकडी या योजनेत कुकडीचे पाणी करमाळा तालुक्याला मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावास शासनाने अनुकूलता दाखविली असून उजनी-कुकडी योजनेत कुकडीचे पाणी करमाळा तालुक्यासाठी ५ हजार हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर आहे. हे पाणी कॅनॉलद्वारे न नेता उजनीत सोडून उजनीतून ते पाणी वाशिंबे येथून उचलून पोंधवडी चारीत (बोगदा) सोडून तेथून ते पाणी कुकडी जुन्या कालव्याद्वारे मांगी तलावात तसेच जातेगावपर्यंत दिले जाणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात केत्तूर येथून उजनीचे पाणी उचलून चारी क्र. १९४ (किमी) येथे कुकडी चारीत पाणी सोडायचे आहे. तेथून कालव्याद्वारे ते पाणी तालुक्यातील शेतीत दिले जाणार आहे. याबाबतचा सर्व्हे पाटबंधारे विभागाने केला असून तसा अहवाल शासनाला सादर केला आहे. त्यानुसार ही योजना सुप्रमोमध्ये घेण्याचे ठरले आहे. ही योजना लवकरात लवकर कार्यान्वित करुन तालुक्यातील २५ हजार हेक्टर क्षेत्राचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. दहिगाव उपसा योजनेच्या अपूर्ण कामासाठी ११६ कोटी रुपयांचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांची वर्कऑर्डर निघाली आहे.

त्यामुळे दहिगाव योजनेचे सर्व प्रश्न सुटणार आहेत. उन्हाळ्यामध्ये पाणी कमी पडू नये म्हणून दोन टप्प्यासाठी दोन जादा विद्युत पंप बसविण्यात येणार आहेत. यामुळे पाणी खाली गेले तरी दहिगाव योजनेसाठी पाणी कमी पडणार नाही. तसेच सर्व उपचारीची कामे करण्यात येणार असून दहिगाव योजना अद्ययावत करुन ती चांगल्या पध्दतीने चालवण्यात येणार आहे.

अजितदादांमुळे भरघोस निधी

आपल्या पदाची शपथ घेताच पहिल्याच भेटीत करमाळा तालुक्यासाठी अभी अनुदान दिलेले आहे. या योजनेसाठी ११६ कोटींच्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली असून वर्कऑर्डर निघालेली आहे. जातेगाव-टेंभुणी या हायवे रस्त्यासाठी मान्यता मिळालीआहे. नगर ते जातेगावपर्यंच्या रस्ता झाला आहे. तेथून जातेगाव ते टेंभुर्णीपर्यंत २८ मीटरचा रस्ता डांबरीकरणासाठी मंजुरी मिळालेली आहे. साईडपट्ट्या व सर्व्हिस रोड वगळता हा रस्ता होणार आहे. या रस्त्यांची लवकरच निविदा निघणार आहे. याशिवाय ग्रामीण रस्त्यासाठी २५ कोटी , थेट अनुदान १० कोटी, समाजकल्याणसाठी ५ कोटी रुपये असा निधी मंजूर झाला आहे. गेल्या नऊ महिन्यात एक रुपयाचेही अनुदान मिळालेले नाही. अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर तातडीने अनुदान मिळाले असून विविध विकासकामांना मान्यतामिळाली असून कामांना गती मिळाली आहे, असे आ. संजय शिंदे यांनी सांगितले.

करमाळा तालुक्यातील एमआयडीसीसाठी सांगली येथे कार्यालय आहे. उद्योजकांची गैरसोय होऊ नये म्हणून या कार्यालयाचे टेंभुर्णी व करमाळा एमआयडीसीसाठी उपविभागीय कार्यालय सुरु करण्याची मागणी केली

उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त ६६३ रुग्णाची मोफत नेत्र तपासणी

✔ **अकलूज** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या ६३ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अकलूज शहर यांचेवतीने भव्य नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन शिवसेना प्रवक्ते लक्ष्मण हाके सर, शिवसेना जिल्हा प्रमुख संभाजीराजे शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवसेना तालुकाप्रमुख संतोष राऊत व शिवसेना अकलूज शहर प्रमुख अनिल बनपट्टे यांच्या नेतृत्वाखाली अकलूज येथे हे मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास अकलूज शहर व परीसरातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. ६६३ लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. या पैकी ४२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार आहे तर २० रूग्णांना चष्मे वाटप करण्यात येणार आहेत.

यावेळी शिवसेना नेते दत्तात्रय मुंडफणे, उपतालुका प्रमुख महादेव बंडगर, तालुका उपप्रमुख अकबर भाई तांबोळी, माळीनगर शहर प्रमुख अरुण मदने, युवासेना उपतालुका प्रमुख डॉ.निलेश कांबळे, सोशलमीडिया तालुकाप्रमुख अवधुत कुलकर्णी, ग्राहक संरक्षण कक्ष तालुका प्रमुख उमेश जाधव, जेष्ठ शिवसैनिक लक्ष्मण डोईफोडे, संदीप कदम, दिपक खंडागळे, बाळासाहेब सुर्यवंशी, बाबूलाल तांबोळी, नागनाथ मगर, गोरख पवार, शफिक तांबोळी, असलम तांबोळी, गणेश काळे, बाळासाहेब भोसले, संजय गुंड-पाटील, मिलिंद मोरे रज्जाक मुलाणी व शिवसैनिक उपस्थित होते.

चपळगाव येथे सहानुभूती पूर्वक आर्थिक स्वरूपात मदत

✔ **अक्कलकोट** : आमदार सचिन कल्याणशेट्टी व तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या समवेत चपळगांवचे सरपंच उमेश पाटील यांच्या हस्ते आरती अंबणप्पा बिराजदार त्या मुलीचे सोलापूर-पुणे हायवेवर अपघाती निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना सहानुभूती पूर्वक आर्थिक स्वरुपात मदत म्हणून २,००,०००/- (दोन लाख रुपये) ची आर्थिक स्वरुपात मदत देण्यात आली. ह्यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती आप्पासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते अंबणप्पा भंगे, बसवराज बाणेगाव, पंडीत पाटील, मनोज इंगुले, सुरेश सुरवसे, त्याचबरोबर पोलिस पाटील चिदानंद हिरेमठ,तलाठी जारवाल, राजकुमार झिंगाडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

बुध्द विहारासाठी आ. भारतीय यांच्यकडून निधी भिमरत्न मंडळातर्फे आवताडे यांचा सत्कार

✔ **विरवडे बु** : मोहोळ तालुक्यातील विरवडे बुद्रुक येथे विधानपरिषद सदस्य आ. श्रीकांत भारतीय यांच्या आमदार फंडातून अंकुश भैय्या आवताडे यांच्या प्रयत्नातून बुध्द विहारासाठी दहा लाख निधी मंजूर झाल्याबद्दल शनिवारी भिमरत्न तरुण मंडळ व अण्णाभाऊ साठे मंडळाच्या वतीने भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश भैय्या आवताडे यांचा बुके, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना भैय्या आवताडे म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही तळागाळात काम करणारी पार्टी आहे. त्यामुळे आ. सुभाष देशमुख, जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, माझी अर्थ व बांधकाम सभापती विजयराज डोंगरे यांच्या नियोजनाखाली व जयसिंग आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत भारतीय यांची भेट घेतली. वास्तविक त्यांचे कार्यक्षेत्र वेगळे असून देखील त्यांनी आपला निधी पहिल्यांदाच सोलापूर जिल्ह्यात बहुजनांच्या विकासाला दिला आहे. या बुध्द विहाराचे लवकरच काम सुरू करून त्याचे लवकरात लवकर लोकार्पण करण्याचा मानस असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी विरवडे बुद्रुकचे सरपंच प्रतिनिधी बाबासाहेब अंकुश, ग्रा.पं. सदस्य उमेश बाप्पा अवताडे, महेश आवताडे, वसंत कांबळे, प्रगतशील बागायतदार ज्ञानेश्वर पाटील, सिध्देश्वर पाटील, महादेव कांबळे, रामकृष्ण कांबळे, रामचंद्र वायमारे, मारूती सर्वगोड, नागनाथ थोरात, गणेश कांबळे, धर्मराज शिवशरण, पिंटू कांबळे, गंगासागर कांबळे, अनिल सर्वगोड, अमोल नाईकनवरे, बाबासाहेब कांबळे, वसंत कांबळे, चंद्रकांत कांबळे, सचिन कांबळे, अक्षय कांबळे, प्रदीप कांबळे, विशाल कांबळे, महेश कांबळे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व. गणपतराव देशमुख यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सांगोला येथे कार्यक्रम

✔ **सांगोला** : सांगोल्याचे माजी आमदार स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या द्वितीय पुण्यस्मरण निमित्त सांगोला येथील गणपतराव देशमुख सहकारी सूतगिरणी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सूतगिरणीचे संचालक चंद्रकांत देशमुख व पोपटराव देशमुख यांनी दिली.

रविवार दिनांक ३० जुलै रोजी सूतगिरणीवर स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या समाधीस्थळी दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टीचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमापूर्वी समाधीस्थळी भजन व कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. तसेच दहा वाजता भाषा प्रभू डॉक्टर पंकज गावडे महाराज यांचे कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी समाधीस्थळी उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे.

'स्वेरी'च्या सौरभ काळे यांची 'त्रिवेणी टर्बाईन' या कंपनीत निवड

✔ सुराज्य/पंढरपूर

मिळाले वार्षिक रु. साडेपाच लाखांचे पॅकेज

'त्रिवेणी टर्बाईन' या बहुराष्ट्रीय कंपनीने येतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील सौरभ संतोष काळे यांची कॅम्पस मधून निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

बेंगलोर येथील 'त्रिवेणी टर्बाईन' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील सौरभ संतोष काळे या विद्यार्थ्याची निवड केली असून त्यांना वार्षिक रुपये साडेपाच लाख इतके पॅकेज मिळाले आहे. त्रिवेणी टर्बाईन ही स्टीम टर्बाईन क्षेत्रातील एक नामांकित कंपनी आहे.

सौरभ काळे यांचे शालेय शिक्षण वाडीकुरोली येथे झाले. दहावीनंतर त्यांनी डिप्लोमा पूर्ण करून डिग्रीच्या पुढील शिक्षणासाठी स्वेरीचे इंजिनिअरिंग कॉलेज निवडले आणि अत्यंत कष्टाने शिक्षण घेऊन यश मिळविले.

स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंट साठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.

अन्नछत्र मंडळ म्हणजे समाजसेवेचा रथच : सचिन मोरे

✔ सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले अन्नछत्र मंडळ हे समाजसेवेचा रथ असून श्रींच्या दर्शनानंतर महाप्रसाद घेऊनच श्री स्वामी समर्थांची परिक्रमा पूर्ण होत असल्याचे मनोगत मनसे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांचे स्वीय सहाय्यक व राज्य सचिव सचिन मोरे मुंबई यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटूंब आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सिद्दीताई मोरे, मनसेचे अमर कुलकर्णी, मल्लिनाथ पाटील, देवेंद्र शिंदे, आदर्श मळगी, अविनाश स्वामी, निखिता राठोड, श्रीकांत पाटील, राजकुमार यादव, अनिल अवताडे, शरण ढेपे, किरण जोगदनकर हे उपस्थित होते.

याप्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, पुरोहित संजय कुलकर्णी, दत्ता माने, निखिल पाटील, गोटू माने, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, शरद भोसले, चंद्रकांत हिबारे, संभाजीराव पवार यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

अपघातात मयत झालेल्या वारसदारांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत

✔ सुराज्य/अक्कलकोट

दि १ फेब्रुवारी २०२३ रोजी सोलापूर-पुणे दरम्यान दौंड येथे खासगी ट्रॅव्हल्स बसचा अपघात होऊन अक्कलकोट तालुक्यातील चप्पळगांव येथील अंबरनाथ शरणाप्पा बिराजदार, सलगर येथील संजय कुमार गणपती पाटील व गोगाव येथील महांतेश बसवणप्पा कलशेट्टी या तियांचा जागीच मृत्यू झाला होता.



आज या तीनही मयतांच्या वारसदारांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रत्येकी एक लाख रुपयांचा धनादेश देण्यात करण्यात आला. यावेळी अक्कलकोटचे तहसीलदार बाळासाहेब सिरसट, प्रदीप जगताप, राजकुमार झिंगाडे, कमलाकर सोनकांबळे तसेच चपळगाव, सलगर व गोगांव येथील प्रतिष्ठित ग्रामस्थ उपस्थित होते.

दलित, ओबीसी, अल्पसंख्याकावरील अन्यायाविरुध्द लढा उभारा : म्हेत्रे

✔ सुराज्य/अक्कलकोट

भाजपाच्या सत्तेच्या काळात दलित ओबीसी अल्पसंख्याकांवर होणारे अन्याय वाढले असून त्यासाठी आपण एकमेकांना सहकार्य लढा उभा केला पाहिजे, असे मत माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी केले.

येथील प्रमिला पार्क येथे शुक्रवारी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी मल्लिकार्जुन पाटील, महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष शीतलताई म्हेत्रे, सिध्दार्थ गायकवाड, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, अशपाक बळोरगी, सुनिल खवळे, मल्लिकार्जुन काटगांव, अशपाक आगसापुरे, सद्दाम शेरीकर, बाबासाहेब पाटील, राजकुमार लकाबशेट्टी आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले, भाजपाच्या प्रवृत्ती विरूध्द लढण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. अक्कलकोट शहरात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दलित, मुस्लिम ओबीसी व इतर अल्पसंख्याक यांच्या वर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात जन आक्रोश जाहीर सभा सोमवार दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता मल्लिकार्जुन मंदिरा शेजारी अक्कलकोट येथे बाळासाहेब आंबेडकर यांची जाहीर सभा होणार आहे. तरी यासाठी काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन केले. यावेळी अशपाक बळोरगी यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी मुबारक कोरबु, शाकीर पटेल, अल्लीबाशा अत्तार, सातलिंग गुंडरगी, अशोक ढंगापूरे, ईरण्णा दसाडे, शहाबाज यळसंगी, राजकुमार म्हेत्रे, बबन पवार, रियाज चंदनवाले, आतीक बागवान, शिवराज पोमाजी, फारूख बबर्ची, मतीन पटेल, अल्तमंश बोरगांवाकर, सायबु गायकवाड , बाजीराव खरात, पंडित चव्हाण, दिलीप गायछोडे, भिमा मलवे, अशोक बंदिछोडे आदीसह काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

संकट काळात भारतीय डाक विभागाच्या ग्रामीण टपाल योजनेचा आधार

✔ सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यातील ब्रहाणपूर येथील रहिवाशी सिध्दप्पा अप्पाराव नागेशी यांचे अचानक निधन झाले, त्यांच्या वासरासस भारतीय डाक विभागाच्या ग्रामीण टपाल योजनेच्या पीक विमा योजनेतंर्गत १ लाख १७ हजार ५४५ रुपयांचा धनादेश सुर्पूद करण्यात आला.

दि. १३ जूलै २०२३ रोजी रोजी क्लेम फॉर्म सादर केला. आणि २६ जूलै रोजी म्हणजे १३ दिवसात वारसाला रक्कम दिली गेली. याप्रसंगी पाटील सहायक अधीक्षक सोलापूर दक्षिण उपविभाग यांचे मोलाचे सहकार्य लाभले

डाक जीवन विमा योजना ही इतर विमा कंपन्यांच्या तुलनेत अतिशय चांगली विमा योजना असून ही जीवन विमा योजना सर्व कर्मचारी, शेतकरी तसेच सर्व व्यापारी वर्गांसाठी अतिशय लाभदायी योजना आहे. या योजनेत कमी हप्त्यात जास्त रक्कम मिळते. या डाक जीवन विमा योजनेचा संकट काळात खूप मोठा आधार मिळाला असल्याची भावना मृत विमाधारक यांच्या पत्नी शरणाबाई शिधप्पा नागेशी यांनी व्यक्त केली व टपाल खात्याचे आभार व्यक्त केले.

याप्रसंगी चपळगाव उपडाकघराचे सब पोस्ट मास्तर आनंद बोराटे, पोस्टमन विजय बिराजदार, डाकसेवक अंकुश गजधाने, शाखाडाकपाल जगन्नाथ पांढरे, सुधाकर शितोळे व डाक विभागातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

पीक विम्यासाठी मुदतवाढ देण्याची शेतकऱ्यांची मागणी

✔ सुराज्य/पिलीव

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामातील पिकासाठी एक रुपयात पीक विमा योजना सुरू केली आहे. याची ऑनलाईन नोदणी करणे आवश्यक आहे. पण यासाठी वापरण्यात येणारे सर्व्हरवच बंद असल्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे पीक विमा उतरवितरवण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी शेतकऱ्यांची केली आहे.

पीक विम्याची मुदत ३१ जुलै रोजी संपत आहे. परंतु गेल्या चार पाच दिवसापासून याचा सर्व्हर बंद यामुळे अनेक शेतकरी पीक विमा भरण्यासाठी महाईसेवा केंद्राकडे धाव घेत आहे पण सर्व्हर बंद असल्यामुळें अनेक शेतकरी पीक विमा भरण्यापासून वंचित आहेत. अनेक ठिकाणी पाऊसही उशिरा सुरु झाला आहे. यामुळे वापसा नसल्यामुळे अद्यापही पेरणीच झालेली नाही. त्यामुळे मुदत वाढविल्यास त्या शेतकऱ्यांना विमा योजनेत सहभागी होता येईल तरी शासनाने मुदत वाढ दयावी अशी मागणी शेतकऱ्यांनमधून होत आहे.

म्हैसाळ योजनेतून पाणी सोडले; आ.आवताडेंच्या मागणीला यश

✔ सुराज्य/पंढरपूर

मंगळवेढा तालुक्यातील दक्षिण भागाला म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्याच्या आ. समाधान आवताडे यांच्या मागणीला यश आले असून या योजनेचे पाणी तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व ओढ्यावरील सिमेंट बंधारे भरून घेण्यासाठी वितरिका क्रमांक - २ द्वारे पाणी सोडण्यात आले आहे. वाढत्या पाणीटंचाईच्या परिस्थितीशी संघर्ष करत असलेल्या या भागातील जनतेला या पाण्यामुळे पाणी प्रश्नाबाबत खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये अपेक्षेप्रमाणे पर्जन्यमान न झाल्याने अनेक शेतकरी व पशुपालक पाण्याअभावी अक्षरशः हवालदील झाले आहेत. दक्षिण भागाच्या गावातील नागरिकांनी या योजनेचे पाणी सोडण्याबाबत आमदार समाधान आवताडे यांच्याकडे मागणी केली होती. या भागातील जनतेच्या सदर मागणी अन्वये म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत पाणीटंचाई असलेल्या मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व तलाव, बंधारे पाण्याने भरून देण्याबाबत आमदार आवताडे यांनी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंता पाटबंधारे विभाग सांगली म्हैसाळ कालवा यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. आमदार आवताडे यांच्या या पत्राची दखल घेऊन संबंधित विभागाकडून या योजनेचे पाणी संबंधित गावांना सोडण्यात आले आहे.

या पत्रामध्ये आमदार आवताडे यांनी नमूद केले होते की, मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागामध्ये गावभेट दौऱ्यानिमित्त अनेक गावात दौरा करत असताना पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या चाऱ्याची खूप मोठ्या टंचाईला या भागातील जनता सामोरे जात आहे. पाण्याची उपलब्धता नसल्याने अनेक शेतकरी व पशुपालक आपले पशुधन जगवण्यासाठी चार ते पाच हजार रुपये प्रति टन या दराने उसाचा चारा दुसऱ्या तालुक्यातून आणत आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी पशुपालकांसाठी ही बाब आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही. आ आवताडे यांनी या सर्व बाबींचा सखोल पध्दतीने विचार करून या योजनेचे पाणी लवकरात लवकर सोडण्यात यावे अशी मागणी संबंधित अधिकाऱ्यांना केली होती.

जनतेला मिळाला दिलासा

या भागातील जनतेचा पाणी प्रश्न व आमदार आवताडे यांच्या मागणीचा रेटा लक्षात घेऊन या योजनेचे पाणी तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व ओढ्यावरील सिमेंट बंधारे भरून घेण्यासाठी वितरिका क्रमांक - २ द्वारे पाणी उपलब्ध सोडण्यात आले आहे. वाढत्या पाणीटंचाईच्या परिस्थितीशी संघर्ष करत असलेल्या या भागातील जनतेला या पाण्यामुळे पाणी प्रश्नाबाबत खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रतिकात्मक अंतराळवीर खड्ड्यात उतरवून युवक काँग्रेसने केला महापालिकेचा निषेध

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर युवक काँग्रेसने छत्रपती संभाजी महाराज चौकात प्रतिकात्मक अंतराळवीर खड्यात उतरवून भाजप आणि सोलापूर महापालिकेचा निषेध केला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

शहरात मोठया प्रमाणात खड्डे पडले आहेत, अनेक भागात रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. शहरात असा एकही रस्ता नाही ज्या ठिकाणी खड्डे नसतील, या खड्यामुळे शहरातील नागरिकांना अनेक आजार उदभवत आहेत, अनेक अपघात होत आहेत, सोलापूरसह राज्यातील सर्वच शहरातील रस्त्यांची अवस्था खराब आहे, सत्तेवर येण्यापूर्वी भाजपने शहरातील नागरिकांना रस्ते चांगले करू, पाणी पुरवठा व्यवस्थित करू असे आश्वासन देऊन गाजर दाखवले आहे. दरम्यान शहरातील रस्त्यांची अवस्था खराब झाली असून अनेक अपघात होत आहे, निवडणुकीअगोदर भाजपने सत्तेवर येण्यापूर्वी रस्ते, दिवाबत्ती, पाणी याबाबत मोठी आश्वासने देऊन शहरवासियांना गाजर दाखवले आहे.

महापालिका जशी टॅक्स वसुली करते, त्या पध्दतीने शहरातील खड्ड्याकडे लक्ष द्यावे अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा युवक काँग्रेस शहर अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी दिला. यावेळी सचिव श्रीकांत वाडेकर, अनंत म्हेत्रे, प्रवीण जाधव, उत्तर विधानसभा अध्यक्ष महेश लोंढे, शरद गुमटे, सुनील सारंगी, प्रवीण वाले, अनिल जाधव, सुशीलकुमार म्हेत्रे, शुभम माने, धीरज खंदारे, महेंद्र शिंदे, आशुतोष वाले, चेतन जंगम, किरण राठोड, बबलू जाधव, गणेश म्हेत्रे, यासीन शेख, शंकर लोखंडे, सचिन घाटे, राजू नाईक, अजय जाधव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

छोटे पंजे, बडे पंजे भेटीचा अनुपम्य सोहळा रंगला

थोरला मंगळवेढा तालिमच्या पीर बडा मंगलबेडा मिरवणुकीत हिंदू मुस्लिम एकोपा

मोहरमची सांगता

✔ सुराज्य/सोलापूर

मोहरम निमित्ताने सोलापूर शहर परिसरात मोठ्या उत्साही वातावरणात विविध पंजांची मिरवणुका निघाल्या. मोहरमचे प्रमुख आकर्षण म्हणून ओळख असलेल्या धावती मशाल मिरवणूक देखील शनिवारी पहाटे निघाली. शनिवार पेठ येथून इमामे हुसेन दरवेश पंजांची धावती मशाल मिरवणूक या हुसेन... या हुसेन, नबी के नवासे जिंदाबाद, नारे तकबीर अल्लाहू अकबर असा जयघोषात निघाली. यावेळी छोटे पंजे, बडे पंजे या दोन बंधू भेटीचा अनुपम्य सोहळा भारतीय चौकात हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत शनिवारी रंगला शहरातील सुमारे २५० पंजे, सवारी, ताबूत रात्री विधीपूर्वक थंड होऊन मोहरमची सांगता करण्यात आली.

यंदाच्या वर्षी मोहरम निमित्त शहरात विविध ठिकाणी पंजांची स्थापना करण्यात आली होती. मोहरम निमित्त २४ जुलै ते २९ जुलै दहा दिवस शहरात मानाच्या पंजांची मिरवणूक काढण्यात आली. मोहरमचा उत्सव सोलापूर शहर व जिल्ह्यात हिंदू-मुस्लीम भाविकांच्या सहभागातून मोहरमचा उत्सव पारंपारिक पध्दतीने साजरा झाला. यंदाच्या वर्षी मोहरम सण उत्साहात साजरा करण्यात आला.

शनिवारी दोन बंधू भेटीचा सोहळा भारतीय चौकात मोहरम कमिटीचे अध्यक्ष

मकबुल मोहोळकर यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडला. प्रारंभी मंगळवेढा सवारीची ढोल बाजे च्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी पहिला पंजा वाजत गाजत बारा इमाम चौकातून आला, त्यानंतर दहा मिनिटांनी दुसरा पंजाब सवारी च्या माध्यमातून आणला गेला.

या दोन्हीपैकी एक तलवार पंजा पाच्छा पेठ, दुसरा पंजाब शनिवार पेठेतून येतो सुरक्षाकाकडे दोन्ही पंजे भारतीय चौकात आणले गेले. दोन्ही पंजे भारतीय चौकात आल्यानंतर या हुसेन... या हुसेन... नबी के नवासे जिंदाबाद, नारे तकबीर अल्लाहू अकबर अशा घोषणा देण्यात आल्या. भेटीचा सोहळा पाहण्यासाठी युवक आणि महिलांची ही मोठी गर्दी दिसून आली. विजापूर वेसह भारतीय चौकात पोलिसांचाही तगडा बंदोबस्त होता. मोहरम निमित्त शहरातून पंजाच्या मिरवणुका काढल्यानंतर व भारतीय चौकात दोन पंजाची भेट झाल्यानंतर विजापूर वेस, बेगम पेठ त्याचबरोबर बारा इमाम चौक युवक संघटनेच्या वतीने सरबत वाटप करण्यात आले. काही ठिकाणी महाप्रसाद वाटप करण्यात आले.

सोलापुरात मोहरम उत्सवात वैशिष्ट्यपूर्ण परंपरा लाभलेल्या थोरला मंगळवेढा तालीम येथील पीर बडा मंगलबेडा (अहले हरम) सवारीच्या मिरवणुकीत अठरापगड जातींचे भाविक सहभागी झाले होते. सवारीवर गुलाब पुष्पासह खारिक, बदाम, खोबरे, खडीसाखरेची उधळण करण्यात आली.

आणीबाणी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

✔ सोलापूर : आपलं स्वातंत्र्य कोणी हिरावून घेतलं तर आपलं तर जीवन नीरस होतं, भारतातल्या जनतेला आणीबाणी' लागली होती, त्याकाळात हे प्रकर्षाने जाणवलं होतं. याच पार्श्वभूमीवर एका छोट्याशा गावात घडलेल्या घटनेचा विनोदी अंगाने परामर्श घेत आणीबाणी' या चित्रपटाची कथा रचण्यात आली आहे.मराठी रुपेरी पडदयावर आणीबाणी' सारखा संवेदनशील विषय रंजकपणे मांडण्याचं धाडस दिग्दर्शक दिनेश जगताप यांनी लेखक अरविंद जगताप यांच्या सोबतीने केलं आहे.२८ जुलैला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

भिडे गुरुजींचा पुतळा उलटा लटकावून मिरवणूक

✔ सुराज्य/मोहोळ

श्री शिवप्रतिष्ठानचे मनोहर भिडे गुरुजी यांच्या पुतळ्याला उलटे लटकून मोहोळ शहरातून मिरवणूक काढून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (शरद पवार गट) वतीने प्रदेश चिटणीस रमेश बारसकर यांच्या नेतृत्वाखाली निषेध व्यक्त करण्यात आला असून आला.

यापुढे अशा पध्दतीने बेताल वक्तव्य करत समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचं काम केलं तर या पुढील काळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मनोहर भिडे सारख्यांना रस्त्यावर फिरणं अवघड करू, असा इशारा रमेश बारसकर यांनी दिला.

यानिमित्ताने मोहोळचे तहसीलदारांना निवेदन देऊन मनोहर भिडे यांच्यावर आयपीसी कलम १५३ नुसार गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली. यावेळी नगरसेवक अतुल क्षीरसागर, ज्योती

क्रांती परिषदेचे प्रदेश प्रवक्ते शिलवंत क्षीरसागर, मोहोळ विधानसभा कार्याध्यक्ष मंगेश पांढरे, संतोष सोलनंकर, मोहोळ तालुका उपाध्यक्ष सुरज जाधव, प्राध्यापक प्रकाश सोनवणे, जितेंद्र अष्टुळ, ज्योती क्रांती परिषदेचे युवक जिल्हा कार्याध्यक्ष सागर अष्टुळ, अजय कुर्डे, तन्वीर शेख,रियाज शेख, उमेश गोटे, सुलतान पटेल, अतिश पाटील, राहूल माळी महिला आघाडी तालुकाध्यक्ष संगीता पवार, नंदा गोरे, वर्षा दुपारगुडे आदी सहभागी झाले होते.

कोळेकर महास्वामी यांची पाद्यपूजा व गुरुदान कार्यक्रम

✔ सुराज्य/सांगोला

अधिक मासा अध्यात्माबरोबर नाती जपणारा व गुरुस दान देणारा महिना असून याचे औचित्य साधून रविराज शेटे व सौ. योगिता शेटे (वझरे, ता. सांगोला) यांच्या घरी रुद्र पशुपती कोळेकर महास्वामींची पाद्यपूजा योगीराज शेटे व सौ सुकन्या शेटे यांच्या हस्ते करण्यात आली

तसेच वीरभद्र मंदिर (नाझरे, ता. सांगोला) येथे महास्वामींची महाआरती रविराज स्वामी व सौ. स्वाती स्वामी यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी आज गुरुस दान देण्याचा कार्यक्रम असून दानाचे महत्त्व फार मोठं आहे, असे आदर्श मुख्याध्यापक सिध्देश्वर झाडबुके यांनी सांगितले. तर तांब्याचे ताट आरती व बत्तासे आज महिला वर्गातर्फे गुरुस दान देत आहोत. यावेळी महिला वर्ग मोठ्या संख्येने राहिल्या त्याबद्दल सर्वांचे आभार शिक्षिका नयना जुंदळे यांनी मानले.

द फार्म

कृषी विद्यापीठांकडून अधिक संशोधनाची गरज

गडचिरोली जिल्ह्याला सेंद्रीय शेतीचा जिल्हा म्हणून ओळख मिळावी यासाठी कृषी विभागाने विशेष नियोजन करावे. पारंपरिक शेतीला आधुनिकतेचे बळ देतानाच ती कमी खर्चाची आणि उत्पादन वाढविणारी असावी यासाठी कृषी विद्यापीठांनी वाण आणि अवजार संशोधन करावे, असे आवाहन राज्याचे नगरविकास मंत्री आणि गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. नागपूर विभागीय खरिप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या कृषी विकासासाठी विविध मुद्दे मांडले.

तेलंगणा येथून खतांचा पुरवठा करण्याची परवानगी द्यावी

गडचिरोली जिल्ह्याला खतांचे वितरण चंद्रपूर येथून केले जाते. सिरोंचा तालुका हा सुमारे ३५० किमी मीटरहून अंधिक अंतरावर आहे. या तालुक्याला खतांचा पुरवठा लगतच्या तेलंगणा येथून करण्याची परवानगी देण्यात यावी. जेणेकरून वेळेची बचत होतानाच वाहतूक खर्चही कमी होईल.

मोहफुलांचा वापर पोषक आहारासाठी करावा

गडचिरोली जिल्ह्यात मोह फुलाची मोठी आर्थिक उलाढाला होते. सुमारे ३ लाख मजूर मोहफुल गोळा करण्याचे काम करतात त्याद्वारे १४०० कोटी रुपयांची उलाढाल होते. अशा या मोहफुलांचा वापर केवळ मद्यनिर्मितीसाठी न करताना त्यातील औषधी आणि पोषण मुल्य यासंदर्भात झालेलं संशोधन लक्षात घेऊन लक्षात घेऊन या फुलांचा वापर पोषक आहारासाठी करण्यासाठी प्रयत्न करावेत. याठिकाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी पालकमंत्री श्री. शिंदे यांनी केली.

धान साठवणुकीसाठी गोदामांची संख्या वाढवावी

डचिरोली जिल्ह्यात धानाचे सर्वाधिक उत्पादन घेतले जाते. ते साठविण्यासाठी गोदामांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. हा विषय कृषी संलग्न असल्याने गडचिरोली जिल्ह्यात गोदामांची संख्या वाढविण्यात यावे. जेणेकरून धानाची साठवण क्षमता देखील वाढविता येणे शक्य होईल.

गडचिरोली जिल्ह्यात वनसंपदा मोठी आहे. या जिल्ह्यात कृषि विभागाने विशेष नियोजन करून रासायनिक खते व औषधी विरहीत सेंद्रीय शेतीला चालना देण्यासाठी प्रयत्न करावेत. संपूर्ण गडचिरोली जिल्हा सेंद्रीय शेतीचा जिल्हा म्हणून ओळखला जावा अशी इच्छा पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. गडचिरोली जिल्ह्यात कृषी विभागाची २७९ पदे रिक्त असून ती तातडीने भरण्याची मागणी पालकमंत्री शिंदे यांनी यावेळी केली.

स्ट्रॉबेरी शेतीला चालना मिळावी

गडचिरोली जिल्ह्यात स्ट्रॉबेरी लागवड यशस्वी झाल्याचे सांगतानाच आपण स्वता सहा शेतकऱ्यांना महाबळेश्वर येथून स्ट्रॉबेरीची रोपे उपलब्ध करून दिली होती. त्याची लागवड यशस्वी होऊन शेतकऱ्यांना लाभ झाल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात स्ट्रॉबेरी शेतीला चालना मिळावी अशी सूचना शिंदे यांनी केली.

कोरची तालुक्यात जांभळाचे वन आहे. येथील जाभळांना संपूर्ण राज्यभर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असून संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात जांभळाची शेती करण्यासाठी प्रोत्साहन देतानाच याठिकाणी प्रक्रिया उद्योग देखील सुरू करण्यात यावा, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पाच राज्यांतील निवडणुकीनंतर झालेल्या सर्वेक्षणात शेतकरी आंदोलनाची दखल सर्वच वर्गातील लोकांनी घेतल्याचे दिसते. शेतकऱ्यांच्या आंदोलनाला सोशल मीडियावर समर्थनही मोठ्या प्रमाणात मिळाले असून, सत्ताधारी पक्षातील एक वर्गही कृषी कायदे रद्द करावेत या विचाराचा आहे. लोकांना अजिबात न रुचलेले हे कायदे परत घेण्याची हीच योग्य वेळ आहे.

आता तरी कृषी कायदे रद्द करा

२०१५ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार केंद्रात स्थापन झाल्यानंतर कॉर्पोरेट्सना देशभरातील जमिनी ताब्यात घेणे सोपे बनविणाऱ्या महत्त्वाकांक्षी सुधारणा भूमी अधिग्रहण कायद्यात करण्याचा प्रयत्न सुरू केला; परंतु विरोधी पक्षांकडून प्रचंड प्रमाणात विरोध झाल्याने सरकारला हे बदल मागे घ्यावे लागले. २०२० मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या भाजप सरकारने भारतातील कृषी कायद्यांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचे ठरविले. या सुधारणांमुळे कंपन्यांना शेतकऱ्यांकडून थेट खरेदी करणे सोपे झाले. या सुधारणांच्या माध्यमातून पारंपरिक मध्यस्थ आणि बाजार समित्यांना बाजूला करण्यात आले. विरोधी पक्षांकडून विरोध, सर्वोच्च न्यायालयाकडून मिळालेले आव्हान आणि दिल्लीच्या सीमांवर महिनोन्महिने चाललेले किसान आंदोलन एवढे सगळे होऊनसुद्धा सरकारने निर्णयात जराही बदल करण्याचा विचार केला नाही. केवळ या कायद्यांमध्ये काही सवलतींचा प्रस्ताव सरकार देत राहिले. परंतु कृषी कायदे रद्द मात्र केले नाहीत.

परंतु आता वातावरण बदलत आहे. लोकनीति-सीएसडीएसद्वारा निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या ताज्या सर्वेक्षणातील आकडेवारीने विविध राज्यांमधील आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण समर्थन दिले आहे. भाजप समर्थकांमध्ये कृषी कायद्यांविषयी बेचैनी आहे. सत्ताधारी पक्षाची लोकप्रियता कमी होत असल्याच्या काळात पक्ष सावध असल्याचे दिसून येत आहे आणि लोकांनी नाकारलेले कृषी कायदे परत घेण्याची इच्छा सत्ताधारी पक्षाला आता होत असेल. चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपची एकंदर कामगिरी आणि कोरोना महामारी रोखण्यात सरकारला आलेले अपयश या पार्श्वभूमीवर लोकांमध्ये वाढता आक्रोश असून, सत्ताधारी पक्षाच्या प्रतिमेला निश्चितच धक्का बसला आहे. उत्तर प्रदेशात नुकत्याच झालेल्या पंचायती निवडणुकांचे निकालही सत्ताधारी भाजप सरकारसाठी प्रतिकूल ठरले आहेत. या राज्यात पक्षाला वर्षभरानंतर आणखी एका आव्हानाला सामोरे जायचे आहे. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाने भाजपच्या तुलनेत पंचायती निवडणुकांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. २०१५ प्रमाणेच आताही कृषी कायदे परत घेतल्यास उत्तर प्रदेशात पक्षाच्या जनाधारात होऊ शकणारी घट टळू शकेल.

दिल्लीच्या सीमांवर निदर्शने करणारे शेतकरी प्रामुख्याने पंजाब आणि हरियानातील होते; परंतु त्यांच्या मुद्द्यांना आता सर्वत्र पाठिंबा मिळताना दिसत आहे. शेतकरी आंदोलनांची व्याप्ती केवळ मध्यमवर्गापर्यंत सीमित राहिलेली नाही. मध्यमवर्गातील एका मोठ्या गटाने कृषी कायद्यांना विरोध दर्शविला आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये या वर्गाने भाजपला धक्का दिला आहे. या वर्गाने पारंपरिक आणि नव्या माध्यमांच्या साह्याने आपला आवाज सर्वत्र पोहोचविण्यात यश प्राप्त केले आहे. अनेक मुद्द्यांवर त्यांच्यात राष्ट्रीय पातळीवर प्रभावी बातचीत सुरू झाली आहे आणि कृषी कायदे हा त्यातील एक मुद्दा असू शकतो. मध्यमवर्गाचे सीएसडीएस वर्गीकरण एका जटिल इंडेक्सवर आधारित आहे.

निवडणुकीनंतरचे सर्वेक्षण असे दाखवून देते की, विरोधी पक्षांचे समर्थक हे मुख्यत्वे कृषी कायद्यांना विरोध करणारे लोक आहेत. त्यांची संख्या भाजप समर्थकांपेक्षा जास्त आहे. उदाहरणार्थ, केरळमध्ये ५६ टक्के मतदार तसेच आसामात ५२ टक्के मतदार काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या समर्थकांनी कृषी कायद्यांना विरोध दर्शविला आहे. परंतु बहुतांश भाजपच्या समर्थकांपैकी एका गटानेही कृषी कायद्यांना विरोध केला आहे. आसाममध्ये भाजपने पुन्हा एकदा सत्ता संपादन केली आहे. परंतु येथे २६ टक्के असे आहेत, ज्यांनी कृषी कायदे निरस्त केले गेले पाहिजेत असे वाटते म्हणून मत दिले आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजप मतदारांमध्ये २२ टक्के लोकांनी नव्या कृषी कायदे रद्द करण्यासाठी आपले समर्थन देऊ केले आहे. अर्थात केरळ आणि तमिळनाडूत भाजप हा प्रभावी पक्ष नाही. अन्य पक्षांशी आघाडी करून तेथे भाजपने निवडणुका लढविल्या. परंतु तिथेही नवीन कृषी कायद्यांना पाठिंबा असल्याचे कुठेच दिसून आले नाही. निवडणुकीनंतर झालेल्या सर्वेक्षणाची आकडेवारी असे दर्शविते, की शेतकऱ्यांच्या आंदोलनाविषयी सर्वत्र जागरूकता आहे. हे सर्वेक्षण चार राज्यांत करण्यात आले. शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ सोशल मीडियाच्या योगदानामुळे देशभरात शेतकऱ्यांच्या बाजूने समर्थन प्राप्त झाले आहे. एखादा माणूस शेतकरी असो वा अन्य व्यवसाय करणारा असो, गावातील रहिवासी असो वा शहरातील असो, या मुद्द्यापासून आपण अनभिज्ञ असल्याचे फारच कमी लोकांनी सांगितले.

सध्या भाजप अनेक संकटे झेलत असताना समस्या आणखी अक्राळविक्राळ होण्यापूर्वी नव्या कृषी कायद्यांचे दफन करणेच चांगले! निवडणुकीनंतरचे हे सर्वेक्षण ही त्यासाठीची चांगली संधी आहे. तिचा वापर करून भाजपने पक्षावरील संकटाची तीव्रता कमी करायला हवी.

– संजय कुमार

राजकीय निरीक्षक, नवी दिल्ली

भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत मोठे फेरबदल

१३ उपाध्यक्ष, ९ सरचिटणीस, १३ सचिवांची घोषणा

✔ सुराज्य/नवी दिल्ली

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांसाठी आता सर्वपक्षीयांकडून मोर्चेबांधणी केली जाऊ लागली आहे. विरोधी पक्षांनीही INDIA या नावाने आघाडी करून भाजपाविरोधी पक्षांची मोट बांधली आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकांची रंगीत तालीम ठरावी अशा काही राज्यांच्या विधानसभा निवडणुका पुढच्या काही महिन्यात होणार आहेत. यामध्ये राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा व महाराष्ट्र अशा काही महत्त्वाच्या राज्यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर आता भाजपानंही कंबर कसली असून पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.

भारतीय जनता पक्षाकडून एकूण १३ राष्ट्रीय उपाध्यक्ष, ९ सरचिटणीस व १२ सचिवांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये वेगवेगळ्या राज्यातल्या महत्त्वाच्या नेत्यांच्या [illegible] करण्यात आला आहे. तसेच, तेलंगणा भाजपाचे माजी अध्यक्ष बांडी संजय कुमार यांचाही समावेश पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातून तीन नेत्यांचा समावेश

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ए. के. अँटनी यांचे पुत्र अनिल अँटनी यांचाही समावेश भाजपानं राष्ट्रीय कार्यकारिणीत केला असून त्यांच्याकडे राष्ट्रीय सचिव पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वीच अनिल अँटनी यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भाजपामध्ये प्रवेश केला होता. विनोद तावडे यांच्यावर राष्ट्रीय सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याशिवाय पंकजा मुंडे व विजया रहाटकर यांचा समावेश राष्ट्रीय सचिव म्हणून करण्यात आला आहे.

मुंबईला पुन्हा दहशतवादी हल्ल्याचा धोका

▶ दहशतवाद्यांकडे सापडले छबाड हाऊसचे फोटो ▶ पोलीस यंत्रणा सतर्क

✔ सुराज्य/मुंबई

मुंबईतील कुलाबा येथील छबाड हाऊसचे फोटो दहशतवाद्यांकडून सापडल्याने खळबळ माजली आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाला (एटीएस) दहशतवाद्यांकडून कुलाबा येथील चाबड हाऊसचे गुगल फोटो सापडले आहेत. यामुळे यंत्रणा संतर्क झाल्या असून छबाड हाऊसच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

दहशतवादी संशयितांकडून छबाड हाऊसचे फोटो

एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, कुलाबा येथील छबाड हाऊसचे काही गुगल फोटो संशयित आरोपींकडून सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर छबाड हाऊसची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

छबाड हाऊसमध्ये आधीच अतिशय उच्च सुरक्षा आहे. गुरुवारी मध्यभागी आणि बाहेरील भागात एक मॉक ड्रिल देखील घेण्यात आली, अशी माहिती कुलाबा पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

कोलाबामधील छबाड हाऊसवर सुरक्षा

२६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या लक्ष्यांपैकी एक असलेल्या छबाड हाऊसचे गुगल फोटो दहशतवाद्यांकडे सापडले आहेत. या दोन आरोपींना हल्ल्याचा कट रचल्याबद्दल राजस्थानमधून अटक करण्यात आली. दरम्यान या घडामोडीनंतर पोलिसांनी कुलाबा येथील ज्यू कम्युनिटी सेंटरमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने मुंबई पोलिसांना या संदर्भात माहिती दिली होती. त्यानंतर या ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली असून पोलिसांकडून मॉकड्रीलही सुद्धा घेण्यात आलं.

दोन दहशतवादी एटीएसच्या ताब्यात

एटीएसने काही दिवसांपूर्वी मोहम्मद इम्रान मोहम्मद युनूस खान आणि मोहम्मद युनूस मोहम्मद याकूब साकी यांना पुणे पोलिसांकडून ताब्यात घेतले होते. हे दोघेही राजस्थानमधील रतलाम येथील असून ते आता महाराष्ट्र एटीएसच्या ताब्यात आहेत. या दोन्ही आरोपींवर NAI कडून पाच लाख रुपये बक्षीस सुद्धा जाहीर करण्यात आलेली होतं. त्याचबरोबर हे आरोपी अल् सुफा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचा तपासात निष्पन्न सुद्धा झालं आहे.

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी भारताने मदत करावी

निर्वासित पंतप्रधान नेला कादरी यांची गंगा पूजा करत स्वातंत्र्याची प्रार्थना

✔ सुराज्य/हरिद्वार

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी जो प्रयत्न सुरू आहे, त्याला भारताने मदत करावी, अशी मागणी बलुचिस्तानच्या निर्वासित पंतप्रधान नेला कादरी यांनी केली आहे. पाकिस्तानने बलुचिस्तानचा प्रदेश जबरदस्तीने बळकावला असून त्याच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही संयुक्त राष्ट्रात आवाज उठवला असून त्याला नरेंद्र मोदींनी पाठिंबा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

बलुचिस्तानच्या बंडखोर नेत्या नेला कादरी यांनी उत्तराखंडमधील हरिद्वार येथील व्हीआयपी घाटावर गंगा आरती केली आणि बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यलढ्याला यश मिळावी अशी प्रार्थना केली. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यलढ्याला मदत करण्याची भारताला आज संधी आहे, ती उद्या कदाचित मिळण्याची शक्यता नाही, त्यामुळे भारताने पूर्ण ताकतीने बलुचिस्तानच्या मागे उभे रहावे अशी मागणीही त्यांनी केली. नेला कादरी यांनी त्यांच्या समर्थकांसह बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याचा लढा सुरू केला असून त्यांनी स्वतःला पंतप्रधान घोषित केलं आहे. सध्या त्या कॅनडामध्ये आश्रयाला आहेत.

केंद्रात नरेंद्र मोदींचे सरकार आल्यानंतर त्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यावर आवाज उठवला होता. पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमध्ये मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. तसेच भारताच्या भूमिकेचे बलुचिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधीर गिलगिट बाल्टिस्तानमधील नागरिकांनी आभार मानल्याचं त्यांनी सांगितलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतलेल्या या भूमिकेनंतर बलुचिस्तामधून त्याचं स्वागत करण्यात आलं होतं. बलुचिस्तानमधील जनता पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मागत असून हा लढा आता आंतरराष्ट्रीय स्तरावर म्हणजे संयुक्त राष्ट्रांमध्ये पोहोचला आहे.

आधी कर्तव्य, नंतर वाढदिवस

फायर ब्रिगेड जवानाच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

✔ सुराज्य/पुणे

वाढदिवशी ड्युटीवर नियालेल्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्याला कुटुंबीयांनी सुट्टी घेण्याचा आग्रह धरला. मात्र कोंढव्यात लागलेल्या आगीचं वृत्त समजलेल्या पुणे अग्निशमन दलाच्या धाडसी जवानाने कर्तव्य आधी, वाढदिवस नंतर, असं म्हणत तत्परता दाखवली. दशरथ माळवदकर यांच्यासह फायर ब्रिगेडच्या जवानांच्या साहसामुळे मोठा अनर्थ टळला.

शनिवारी पहाटे पुण्यातील कोंढवा, कौसर बाग येथे आगीची घटना घडली होती. अग्निशमन दलाकडून कोंढवा बुद्रुक व कोंढवा खुर्द येथील फायर ब्रिगेडच्या गाड्या प्रथम रवाना करण्यात आल्या होत्या. या ठिकाणी एक छोटे गोडाऊन व गॅरेज होते. आगीचे मोठे स्वरुप पाहता अतिरिक्त अग्निशमन वाहनेही दाखल झाली होती. दलाच्या जवानांच्या तत्परतेमुळे आग इतरत्र न पसरता धोका टळला व आग पूर्णपणे विझली. सुदैवाने कोणी जखमी झाले नाही.

दरम्यान कोंढवा बुद्रुक अग्निशमन केंद्रातील जवान दशरथ माळवदकर यांचा आज ५४ वा वाढदिवस आहे. ते अग्निशमन दलात गेली २२ वर्षे सेवा बजावत आहेत. ते शनिवारी सकाळी पाळीला जाताना कुटुंबीयांनी त्यांचे औक्षण केले आणि ड्युटीवर जाताना सुट्टी घेण्याचा आग्रह धरला. परंतु त्यांनी कर्तव्य आधी, वाढदिवस नंतर असे म्हणत ड्युटीवर जाणं पसंत केलं.

बंदूक हातात घेऊन बॅनर, पोलिसांनी नांगी ठेचली

✔ सुराज्य/छत्रपती संभाजीनगर

वाढदिवसाचा बॅनर लावताना हातात पिस्तूल घेऊन फोटो लावणाऱ्या स्वयंघोषित 'भाई'सह शुभेच्छुक असलेल्या मित्रांवर जवाहरनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नंतर हे बॅनर पोलिसांनी काढून टाकले आहेत. मात्र, गुरुवारी स्वयंघोषित 'भाई'वर कारवाई करण्यात आल्याची माहिती जवाहरनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व्यंकटेश केंद्रे यांनी दिली.

संतोष ज्ञानेश्वर थोरात (रा. वाघलगाव ता. फुलंब्री) माया भाई ऊर्फ प्रशांत सासवडे (रा. नवनाथ नगर विजय चौक गारखेडा परिसर) अशी बॅनर लावणाऱ्या 'चमको भाई'ची नावे आहे. दरम्यान हे बॅनर चौकात लागल्यानंतर जवाहर नगर पोलिसांना या बॅनरची माहिती मिळाली. हातात शस्त्र घेऊन बॅनर असल्यामुळे जवाहरनगर पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक मानकापे यांनी फिर्याद दिली.

त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, 'गजानन महाराज चौकामध्ये प्रशांत सासवडे याच्या वाढदिवसाचे बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरमध्ये त्याचा 'माया भाई' असा उल्लेख करण्यात आला असून त्याच्या हातात बंदूक आहे. या बॅनरवर संतोष ज्ञानेश्वर थोरात याचा शुभेच्छुक म्हणून उल्लेख करण्यात आलेला आहे. दोनही कार्यकर्ते हे सत्ताधारी पक्षाच्या जिल्हाध्यक्षाच्या जवळचे कार्यकर्ते आहेत.

वाढदिवसानिमित्त विद्रुपीकरण करणारे, बॅनर लावून शहराचे वातावरण खराब केल्याप्रकरणी जवाहर नगर पोलीस ठाण्यामध्ये दोन्ही कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी जवाहर नगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राठोड हे तपास करीत असून दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती जवाहर नगर पोलिसांनी दिली आहे.

महत्त्वाचे वृत्त...

मणिपूर हिंसाचारात परकीय शक्तींचा हात

✔ **मणिपूर :** गेल्या तीन महिन्यांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना पाहायला मिळत आहे. यामुळे मणिपूरमधलं सामाजिक जीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झालं आहे. सामाजिक असंतोषाच्या या घटनांचे पडसाद देशभरात उमटत आहेत. संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये या मुद्द्यावरून विरोधकांनी रान पेटवलं आहे. या पार्श्वभूमीवर आता देशाचे माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांनी मणिपूर हिंसाचाराबाबत गंभीर शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणातील वेगळ्याच बाजूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न माजी लष्करप्रमुखांनी केल्याचं बोललं जात आहे.

भिडेंना गांधीद्वेष भोवला, अमरावतीत गुन्हा दाखल

✔ **अमरावती :** धार्मिक तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने समाजमाध्यमाद्वारे आक्षेपार्ह व्हीडिओ व्हायरल केल्याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी दोन जणांच्या विरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ५०५ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. मधुकर उमेकर (रा. राधानगर) आणि गोपाल गुप्ता (रा. बजरंग टेकडी) यांच्याविरूद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. मधुकर उमेकर यांनी त्यांच्या मोबाईल व्हॉट्सअपवरील वनारसी नावाच्या समूहावर २६ सेकंदाचा एक आक्षेपार्ह व्हीडिओ प्रसारीत केला. हा व्हीडिओ अमरावती शहरातील नसतानादेखील तो अमरावतीचाच असल्याची अफवा पसरविण्यात आली.

पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांना ठाकरेंचा इशारा

✔ **मुंबई :** शिवसेना पक्षात फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे गटाचे अनेक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा पक्षबांधणीला सुरुवात केली आहे. आज त्यांनी मातोश्री येथे सायन मतदारसंघातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी त्यांनी पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांनाही इशारा दिला आहे. जे लोक आपला पक्ष सोडून गेले आहेत, त्यांना आता जय महाराष्ट्र'. आता त्यांचे आणि आपले संबंध तुटले आहेत. आता एवढीच अपेक्षा आहे की, त्यांनी आता पक्षाशी गद्दारी करू नये. पक्षाविरोधी काम करू नये. अन्यथा आपल्याला शिवसैनिक म्हणून याकडे बघावं लागेल, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला इशारा दिला आहे.

राज्यात डोळ्याची साथ; सर्वाधिक रुग्ण पुण्यात

✔ **पुणे :** राज्यात अनेक भागांत डोळे येण्याची साथ सुरू झाली आहे. डिनो विषाणूमुळे डोळे येत असून, राज्यात सर्वाधिक रुग्णसंख्या पुणे शहर आणि जिल्ह्यात नोंदविण्यात आली आहे. राज्यात यंदा २७ जुलैपर्यंत असे ३९ हजार ४२६ रुग्ण सापडले असून, त्यातील ७ हजार ८७१ रुग्ण पुण्यातील आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली. राज्यात पुण्यानंतर बुलढाण्यात मोठ्या संख्येने डोळ्याच्या साथीचे रुग्ण सापडले आहेत. बुलढाण्यात ६ हजार ६९३ रुग्ण आढळले असून, अमरावती २ हजार ६११, गोंदिया २ हजार ५९१, धुळे २ हजार २९५, जालना १ हजार ५१२, वाशिम १ हजार ४२७, हिंगोली १ हजार ४२५, नागपूर महापालिका १ हजार ३२३, अकोला १ हजार ३०६, यवतमाळ १ हजार २९८, परभणी १ हजार १०९, जळगाव १ हजार ९३ अशी रुग्णसंख्या आहे. सर्वांत कमी रुग्णसंख्या रायगडमध्ये असून, तिथे केवळ एक रुग्ण सापडला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत ३२४ रुग्ण आढळले आहेत.

देशात १०+२ ऐवजी नवीन शिक्षण पद्धत, सीबीएसई अभ्यासक्रमात होणार बदल

✔ **पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी, २९ जुलै रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त अखिल भारतीय शैक्षणिक परिषदेचं उद्‌घाटन केलं. नवी दिल्लीतील प्रगती मैदानाच्या भारत मंडप येथे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी शिक्षेचं महत्त्व पटवून देताना भविष्यातील शैक्षणिक बदलांबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. दहावी आणि बारावी ऐवजी नवीन शिक्षण प्रणाली राबवण्यात येणार असून सीबीएसई अभ्यासक्रमात बदल होणार असल्याची मोठी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. भारताला संशोधन आणि नवीन कल्पनांचे केंद्र बनवण्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

१०+२ ऐवजी नवीन शिक्षण पद्धत : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पारंपारिक ज्ञान प्रणालीपासून भविष्यातील तंत्रज्ञानाला संतुलित पद्धतीने महत्त्व देण्यात आले आहे, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं. यावेळी ते पुढे म्हणाले की, 'देशातील शिक्षणतज्ज्ञांनी संशोधन परिसंस्था मजबूत करण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आमच्या विद्यार्थ्यांना नवीन व्यवस्थेची चांगली माहिती आहे. १०+२ शिक्षण पद्धतीच्या जागी ५+३+३+४ शिक्षण पद्धत सुरू केली जात आहे. शिक्षणाची सुरुवात वयाच्या तिसऱ्या वर्षापासून होईल. यामुळे देशात एकरुपता येईल.'

▶ इतिहास रचला

डॉक्टरांनी करुन दाखवले

भूल न देता ब्रेन ट्युमरची शस्त्रक्रिया यशस्वी

✔ सुराज्य/नागपूर

शहरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील मेंदूविकार उपचार विभागात डॉक्टरांनी शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाला जागृत ठेवून रुग्णांच्या मेंदूतील 'ट्यूमर' (गाठ) यशस्वीरित्या काढण्यात यश आले आहे. त्यामुळे ट्यूमरच्या दोन रुग्णांना जीवदान मिळाले असून रुग्णांनाही रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. मिथिलेश गौतम, (२०) आणि रेखा झांजाळ (३०) या दोन रुग्णांवर शस्त्रक्रिया करून त्यांना शुद्धीवर ठेवून मेंदूतील गाठी काढून टाकण्यात आल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपुरातील मिथिलेश आणि मध्य प्रदेशातील रेखा यांना डोकेदुखीचा त्रास होत होता. कुटुंबियांनी त्यांना खासगी रुग्णालयात तपासणीसाठी नेले. खाजगी रुग्णालयात उपचार किफायतशीर नसल्याने अखेर त्यांना सुपर स्पेशालिटीमध्ये आणण्यात आले. ब्रेन ट्यूमरमुळे दोन्ही रुग्णांना बरोबर बोलता येत नव्हते. दोन्ही रुग्णांना ब्रेन ट्यूमर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ही एक धोकादायक शस्त्रक्रिया होती. दुखापत झाली असती तर दोघांची बोलण्याची क्षमताही गेली असती.

केवळ शस्त्रक्रियेसाठी आवश्यक क्षेत्र बधिर करण्यात आली. या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. याला वैद्यकीय भाषेत 'अवेक क्रॅनिओटॉमी' म्हणतात.

२५ गुंठ्यातील टॉमेटो पिकला, पण होत्याचे नव्हते झाले

✔ सुराज्य/कोल्हापूर

राज्यात आणि देशात टोमॅटोच्या किमती गगनाला भिडलेल्या असताना टोमॅटोची किमती १५० ते २०० रुपये किलोच्या दरम्यान सुरू आहे. यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली असून टोमॅटोमुळे शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. मात्र, हेच चांगले दिवस काही समाजकंटकांना बघवत नसून गेल्या काही दिवसांपूर्वी शेतकऱ्याचे पूर्ण शेतातील पीक उपटून टाकण्याचे घटना ताजी असतानाच आता रात्रीचा फायदा घेत टोमॅटो चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाडमध्ये ही घटना घडली असून अशोक मरके यांच्या वीस गुंठ्यातील २५ कॅरेट टोमॅटो चोरुन नेले आहे.

आजपर्यंत आपण सोनं, गाडी, पैसा अशा गोष्टी चोरी झाल्याचे ऐकले असेल. पण चोरटे टोमॅटो ही चोरी करतील असा कोणी विचार केला नव्हता.

टोमॅटो आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्याने चोरांनी चक्क टोमॅटो चोरीलाही सुरुवात केली आहे. असाच एक प्रकार कोल्हापुरात उघडकीस आला. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील हेरवाड येथील शेतकरी अशोक मरके यांच्या शेतातली तब्बल २० गुंठ्यातील २५ कॅरेट टोमॅटो चोरुन नेले आहे. म्हरके हे दरवर्षी भाजीपाल्याची शेती करतात. यंदा २५ गुंठ्यामध्ये त्यांनी टोमॅटोची लागवड केली. ते मागच्या दोन दिवसांपूर्वी शेतात येत पिकाची पाहणी करून टोमॅटो तोडण्याच्या नियोजनात होते. परंतु शेतात आल्यानंतर टोमॅटोच नसल्याने त्यांना धक्का बसला. यामुळे शेतकऱ्याला तब्बल ५० हजार रुपयाचे नुकसान झाले आहे. अशोक मरके यांच्या शेतात टोमॅटोचे पीक घेण्यात आले होते. अंधार आणि पावसाचा फायदा घेत तसेच सीसीटीव्हीला चकवा देत चोरट्यांनी टोमॅटोची चोरी केल्याने शेतकरी हवालदिल झाला असून या प्रकरणी आता पोलीस तपास हा सुरु करत आहे.

वर्षभरात १० दहशतवाद्यांना अटक

✔ सुराज्य/पुणे

दहशतवादी कारवायांना खीळ बसल्याने गेल्या काही वर्षांत घातपातापासून सुरक्षित राहिलेल्या पुण्यात 'दहशतवादी आणि स्लीपर सेल' पुन्हा सक्रिय झाल्याने शहराला दहशतवाद्यांपासून धोका निर्माण झाला आहे. मागील वर्षभरात दहा दहशतवाद्यांना तपास यंत्रणांनी पुण्यातून अटक केल्याने पुणे दहशतवाद्यांच्या रडारवर आहे का, हा प्रश्न पुन्हा चर्चिला जात आहे.

दहशतवाद्यांची पाळेमुळे शहरातील विविध भागात खोलवर रुजल्याचे स्पष्ट झाल्याने शहर पोलिसांसह तपास यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आहेत. दीड-दोन वर्षांपासून पुण्यात वास्तव्य असलेल्या दहशतवाद्यांबद्दल कोणत्याच यंत्रणेला कशी कल्पना नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. दहा दिवसात चार दहशतवाद्यांना पुण्यातून अटक करण्यात आल्याने दहशतवाद्यांचा धोका अधोरेखित झाला आहे. अफाट शहरीकरण झालेल्या पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असल्याने सर्वसामान्यांच्या जीवनावर परिणाम झालेला असताना दुसरीकडे थेट दहशतवादी कारवायाही उघड होत असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

वर्षभरात पकडलेले आरोपी

राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) दापोडी परिसरातून जुनैद महंमद अता महंमद (वय २८, रा. दापोडी) याला तसेच त्याचा साथीदार आफताब हुसैन शाह (वय २८, रा. किश्तवाड, जम्मू काश्मीर) याला किश्तवाड येथून अटक केली होती. एटीएसने पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेच्या कोंढव्यातील कार्यालयावर छापा टाकून अब्दुल कयूम शेख (रा. साहिल सर्वदा, कोंढवा) आणि रझी अहमद खान (रा. अशोका म्यूज, कोंढवा) यांना अटक केली होती. अशोका म्यूज येथे पूर्वी आरोपी पकडण्यात आल्याने ही सोसायटी चर्चेत आहे. महंमद युनूस महंमद याकू साकी (वय २४) आणि महंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय २३, दोघे रा. चेतना गार्डन, मीठानगर, कोंढवा) या दहशतवाद्यांना कोथरूड पोलिसांच्या पथकाने नुकतीच अटक केली. तसेच त्यांना राहण्यासाठी खोली देणाऱ्या अब्दुल कादीर दस्तगीर पठाण (वय ३२ रा, कोंढवा) याला एटीएसने अटक केली.

अधिक मास एकादशीसाठी पंढरपुरात भाविकांची गर्दी

■ दर्शन रांगेत महिला भाविकांना स्वच्छतागृह आणि शौचालय नसल्यामुळे प्रचंड त्रास

✔ सुराज्य/पंढरपूर

अधिक महिन्यातील एकादशीनिमित्त आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गाभाऱ्यात आकर्षक फुलांची आरास करण्यात आली होती. अधिक मास असल्यामुळे ३-४ लाख भाविकांची गर्दी पंढरपूरात पाहायला मिळाली. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठीची रांग गोपाळपूर पर्यंत गेली होती मात्र दर्शन रांगेतील महिलांकरिता दर्शन रांगेजवळ शौचालय नसल्यामुळे महिला भाविकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय निर्माण झाली आहे. शौच आणि इतर गोष्टींसाठी उघड्यावर महिलांना जाण्याची वेळ आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाविकांना कोणत्याही गोष्टीचा त्रास होऊ नये, अशी व्यवस्था करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनानाला दिल्या होत्या. मात्र आषाढी यात्रा झाल्यानंतर मंदिर समितीचा कारभार राम भरोसे असल्याचे पाहायला मिळत आहे. पत्राशेड आणि दर्शन रांगेत भाविकांना खूप यातना सहन कराव्या लागत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या सुचनेनंतर देखील पत्राशेड आणि दर्शन रांगेत मुबलक पाणी पुरवठा केला जात नाही. भाविकांना विकत पाण्याच्या बॉटल्स घ्याव्या लागत आहेत.

वर्षाला जवळपास साडेतीन कोटी भाविकांना दर्शन देणाऱ्या विठुरायाच्या दर्शन रांगेत उभे राहणे ही वारकऱ्यांची सत्व परीक्षा असते. यात वृध्द भाविकांसोबत महिला आणि लहान मुलानाही दर्शन रांगेत या यातना सोसाव्या लागतात. दिवस रात्र दर्शन रांगेत उभे राहून दर्शन घेणारा हा भाविक याबाबत कधीच तक्रार करीत नाही. मात्र आता भाविक देखील यावर बोलू लागले आहेत. अजून किती वर्षे आम्ही अशा यातना भोगून दर्शन घ्यायचे असा सवाल विठ्ठलभक्त करू लागले आहेत.

अधिक महिन्याच्या एकादशीसाठी गर्दी होईल या अनुषंगाने भाविकांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज असल्याचे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात

भाविकांना कोणत्याच सुविधा उपलब्ध नव्हत्या. दर्शन रांगेत शौचालय आणि स्वच्छता ठेवण्याच्या सूचना मंदिर समितीला देण्यात आल्या होत्या. मंदिर समितीने तात्पुरती शौचालय उभी केली नाहीत. त्यामुळे महिला भाविकांना प्रचंड यातना सहन कराव्या लागल्या. सकाळी ६ वाजता दर्शन रांगेत उभ्या राहिलेल्या महिलांना शौचालय, लघवीला जाण्यासाठी कोणतीच व्यवस्था केली नसल्याने महिला भाविकांना आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. अनेक महिला भाविकांना उघड्यावर विधी करण्याची वेळ आली होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरात येणाऱ्या भाविकांच्या सुख सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी भाविकांनी केली आहे. गेल्या महिन्यात वारीच्या तोंडावर रस्ते डांबरीकरण करण्यात आले होते. त्या रस्त्यावर आता डांबर दिसत नाही. शहरात मोठं मोठे खड्डे पडले आहेत. मुख्यमंत्र्यांनी पंढरपुरकडे विशेष लक्ष घालण्याची मागणी भाविकांनी केली आहे. मंदिर समितीला दर्शन रंग आणि पत्राशेड येथे शौचालय आणि स्वच्छता ठेवण्यासाठी सोयी देण्यासाठी मंदिर समिती आणि नगरपालिका कर्मचाऱ्यांना सांगितले आहे, असे स्थानिक प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

पंढरपुरात महिला भाविकांना उघड्यावर लघु शंका करण्यासाठी जाणे हे अत्यंत दुर्दैवी बाब आहे. या संदर्भात मी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि पंढरपूरचे प्रांत अधिकारी यांच्याशी बोलले आहे. त्यांना व्हिडिओ देखील पाठवले आहेत. दोन दिवसात महिला भाविकांसाठी दर्शन रांगेत शौचालयाची व्यवस्था करण्याच्या सूचना केल्या आहेत तसेच यासंदर्भात जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

- रुपालीताई चाकणकर, अध्यक्षा महिला आयोग

महिला भाविकांच्या बाबतीत असा प्रकार घडणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. महिलांसाठी पुरेशी स्वच्छता ग्रह आणि शौचालय उभारणे गरजेचे आहे त्यासाठी स्थानिक आणि जिल्हा प्रशासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे.

- अभिजित पाटील, अध्यक्ष विठ्ठल साखर कारखाना

पत्नीला त्रास दिल्याने पतीवर गुन्हा

✔ **सोलापूर** : पोटगी, निवास व संरक्षणाबाबत न्यायालयाकडून आदेश दिलेला असताना सुध्दा त्या आदेशाचे पालन न करता पत्नीस त्रास दिल्याबद्दल पतीच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कलमाप्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पिडीता हिचे २०१० साली मानाजी मुरलीधर गंगणमले (वय-३५, रा.लोणारवाडी,ता. पंढरपूर) यांचेसोबत लग्न झाले होते.लग्नानंतर सुमारे १० वर्षे पतीने व्यवस्थित नांदविले. त्यानंतर पती व सासरकडील लोकांनी घरगुती कारणावरुन तसेच चारित्र्यावर संशय घेवून त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे फिर्यादी यांनी पंढरपुर येथील कोर्टात पोटगी, निवास व संरक्षणाचे आदेश मिळणेबाबत अर्ज केला होता. त्यानुसार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पंढरपूर यांनी ८ मे २३ रोजी पतीने पिडिताला दरमहा ९ हजार रुपये घरभाडे दयावे.दरम्यानच्या काळात त्रास न देणेबाबत तसेच राहण्यासाठी पर्यायी घराची व्यवस्था करणेबाबत आदेश दिला होता. परंतु आरोपीने न्यायालयाचे हे आदेश पाळले नाहीत. त्यामुळे पीडिताने पोलीस ठाण्यात पतीच्या विरोधात फिर्याद दिली आहे.

करमाळा बसस्थानकत ३८ हजाराचा ऐवज पळविला

✔ **सोलापूर** : करमाळा येथील बस स्थानकात एका महिलेच्या पिशवीत हात घालून चोरट्याने रोख रकमेसह ३८ हजाराचे दागिने असलेले पर्स पळवली . ही चोरी काल शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. यासंदर्भात लक्ष्मण भगवंत निळ (रा. निमगाव) यांनी करमाळा पोलिसात तक्रार दाखल केली. ते आपल्या पत्नी लता याच्यासोबत करमाळा बस स्थानकात आले होते.गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या पत्नीच्या पिशवीत हात घालून पर्स पळवली. असे त्यांच्या फिर्यादीत नमुद आहे. हवालदार शेळके पुढील तपास करीत आहेत.

शहरातील तीनही विधानसभेवर भाजपचा झेंडा फडकवणार

नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांची गर्जना : शहर भाजपतर्फे झाला सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर

अडचणी अनेक आहेत. परंतु त्यासर्वांवर मात करून भाजपच्या वरिष्ठ आणि कार्यकर्त्यांच्या सहयोगातून सोलापूर शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार निवडून येतील अशी गर्जना भारतीय जनता पार्टीचे नूतन शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी केली. भाजपाच्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शहर भाजपतर्फे नरेंद्र काळे यांचा सत्कार शनिवारी शांतीसागर मंगल कार्यालयात कार्यकर्त्यांच्या मोठ्या गर्दीत करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री आणि भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे होते. याप्रसंगी व्यासपीठावर खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख, लोकसभा निवडणूक

प्रमुख विक्रम देशमुख, माजी महापौर किशोर देशपांडे, भाजपचे माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, माजी आमदार नरसिंग मेंगजी, प्रदेश कार्यकारणी सदस्य हेमंत पिंगळे उपस्थित होते. प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यानंतर नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांचा जंगी सत्कार झाला.नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, भारतीय जनता पार्टीमध्ये कार्यकर्ता हे सगळ्यात मोठे पद आहे. पक्षासाठी पर्यायाने राष्ट्रासाठी निस्वार्थपणे काम करणारा कार्यकर्ता घडवणे हेच आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे. महानगरपालिका विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकांमध्ये सर्व जागांवर भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते निवडून येण्यासाठी सामूहिक प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळणार आहे, असे काळे म्हणाले.

'जय श्रीराम' च्या घुमल्या घोषणा

नूतन शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या सत्काराप्रसंगी कार्यकर्त्यांनी जय श्रीराम, भारतमाता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी सभागृह दुमदुमून सोडले.

भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी अनेकदा लाठ्या खाल्ल्या, रक्त सांडले, जीवाचे रान केले. त्याचे फळ म्हणून संपूर्ण देशात आज भाजपची सत्ता दिसत आहे. मला कोणताही राजकीय वारसा नसताना माझ्यासारख्या सर्वसामान्य घरातून आलेल्या कार्यकर्त्याला पक्षाने मानाचे स्थान दिले आहे. आगामी काळात पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष वाढीसाठी काम करणार असल्याचेही शहराध्यक्ष नरेंद्र काळे यावेळी म्हणाले.

माजी मंत्री दिलीप कांबळे म्हणाले, भाजपाची घोडदौड संपूर्ण देशभरात सुरू आहे. आगामी काळातही भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष राहणार आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत सोलापूर लोकसभेची जागा मागीलपेक्षा दुप्पट मतांनी जिंकू, असा विश्वासही माजी मंत्री दिलीप कांबळे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी नवनियुक्त शहर उत्तर विधानसभा निवडणूक प्रमुख राजकुमार पाटील आणि दक्षिण सोलापूर विधानसभा निवडणूक प्रमुख श्रीकांचना यन्नम यांचा सत्कार करण्यात आला.

भाजपाचे सोलापूर लोकसभा निवडणूक प्रमुख विक्रम देशमुख यांनी प्रास्ताविक तर प्रा. नारायण बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी संजय कोळी माजी सभागृह नेता संजय कोळी, शहर उत्तर विधानसभा निवडणुक प्रमुख राजकुमार पाटील, प्रसाद कुलकर्णी देविदास चेळेकर, परिवहन समितीचे माजी सभापती जय साळुंके, भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष गणेश साखरे, महिला आघाडीच्या अध्यक्षा इंदिरा कुडक्याल, श्रीकांत घाडगे, राम वाकसे, विनोद मोटे, श्रीरंग गवई, समीर देशपांडे, सतिश महाले, प्रेम भोगडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अधिक मासानिमित्त सोलापुरातील १०८ पुरोहितांना अधिक वाण प्रदान

गिरीराज सेवा मंडळाचा उपक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

अधिक मासानिमित्त सोलापुरातील १०८ पुरोहितांना अधिक वाण प्रदान करण्यात आले. गिरीराज सेवा मंडळाच्यावतीने हा उपक्रम सम्राट चौक येथील झंवर लॉन येथे राबविण्यात आला.

अधिक महिन्यानिमित्त ३३ पुरोहितांना दानधर्म करण्याची परंपरा आहे. मात्र प्रत्येक कुटुंबाला ३३ पुरोहित एकत्र भेटणे अशक्य बनते. ही समस्या ओळखून गिरीराज सेवा मंडळाच्यावतीने सोलापूर शहरातील १०८ पुरोहितांना एकत्र आणून सामूहिकरित्या अधिक वाण प्रदान करण्याचा कार्यक्रम करण्यात आला. कमला एकादशीनिमित्त दान देण्याचे महत्त्व अधिक असल्यामुळे शनिवारी हा मुहूर्त साधत हा कार्यक्रम झाला. प्रारंभी वृंदावन येथील श्री पुंडरीकाक्ष वेदांती महाराज यांच्या हस्ते गोपूजन करण्यात आले. यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणीचे पूजन झाले. उपस्थित नागरिकांच्या हस्ते श्री पुंडरीकाक्ष वेदांती महाराज यांचे पाद्यपूजन झाल्यानंतर १०८ पुरोहितांना धान्य, वस्त्र, अलंकार, दक्षिणा यांचे अधिक वाण देण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर वृंदावन येथील नवलकिशोर महाराज, दत्त उपासक विठ्ठल शिरसीकर, अनिरुध्द जोशी होराभूषण अमित देशपांडे उपस्थित होते.

श्री पुंडरीकाक्ष वेदांती महाराज म्हणाले, अधिक महिन्यामध्ये गायत्री मंत्राचा जप करणे महत्त्वाचे आहे. अधिक मासात दानधर्म करणे फलदायी ठरते. नागरिकांची अडचण ओळखून गिरीराज सेवा मंडळाने सुरू केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचेही श्री पुंडरीकाक्ष वेदांती महाराजांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी गिरीराज सेवा मंडळाचे श्रीकांत लड्डा, श्रेयस शहा, अशोक बाहेती, पं. बिरजू महाराज, विजयकुमार वर्मा, कमलेश झंवर, ओमप्रकाश साबू आदी उपस्थित होते. नंदा करवा यांनी सूत्रसंचालन केले.

निसर्ग हॉटेलजवळ ६० हजाराचे दागिने पळविले

✔ **सोलापूर** : चिंचोडी एमआयडीसी येथील हॉटेल निसर्ग समोर पार्किंग मध्ये लावलेल्या मोटारीचे काच फोडून चोरट्याने ६० हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. ही चोरी शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या संदर्भात सनी भारत गालींदे (वय ३७ रा.भाजी मंडई, बारामती) यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली. काल दुपारी ते आपली मोटार निसर्ग हॉटेल समोर लाऊन जेवायला गेले होते. परत आले असता त्यांना मोटारीची काच फुटलेले दिसली. आणि दागिने असलेली पिशवी गायब झाल्याचे आढळले. त्याप्रमाणे त्यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास फौजदार जाधव करीत आहेत

मेंढपाळास मारहाण करून मोटारीतून मेंढी पळविली

✔ **सोलापूर** : तुमच्या जनावराने माझ्या शेतातील पिकाचे नुकसान केले. असे म्हणत मेंढपाळ आणि त्याच्या मुलाला काठी आणि लाथा बुक्क्याने मारहाण करून मोटर चालकाने ७५ हजार रुपये किमतीची गाभण मेंढी घेऊन पसार झाला . ही घटना निमगाव (ता.माळशिरस) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली.या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी योगेश मधुकर इंगळे (रा.निमगाव ता.माळशिरस) याच्याविरुध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात पांडुरंग विठोबा शिंगटे (वय ६१ रा.गारवाड ता.माळशिरस) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते गुरुवारी दुपारी आपले ७० ते ८० मेंढराचा कळप घेऊन आपल्या मुलगा समाधान याच्यासोबत पराकडे निघाले होते. निमगाव येथील कॅनल पट्टी रोडवर योगेश इंगळे हा मोटार घेऊन आला. आणि दोघांना मारहाण केली. त्यानंतर ७५ हजार रुपये किमतीची गाभण मेंढी मोटारी टाकून प्रसार झाला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . फौजदार राऊत पुढील तपास करीत आहेत.

तलवारबाजीसाठी आज निवड चाचणी

✔ **सोलापूर** : कनिष्ठ गट जिल्हास्तरीय तलवारबाजीचे निवड चाचणी स्पर्धा उद्या रविवारी (३० जुलै) रोजी दुपारी चाडेचार वाजता होणार असल्याची माहिती संघटनेचे आध्यक्ष प्रकाश काटोळे यांनी प्रसिध्दी पत्रकात दिली आहे

जिल्ह्यातील सर्व तलवारबाजी खेळाडूंना कळविण्यात आनंद होतो ३१ वी कनिष्ठ गट निवड चाचणी राज्य स्पर्धा ही भंडारा येथे ११ ते १३ ऑगस्ट २०२३ दरम्यान होणार आहेत स्पर्धा भंडारा जिल्हा फेन्सिंग असोसिएशन व महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त माध्यमाने होणार आहे. सोलापूर जिल्हा फेन्सिंग संघ निवड चाचणी स्पर्धा ३० जुलै २०२३ वार रविवार रोजी ठीक साडेचार वाजता ठेवण्यात आली आहे तरी सर्व खेळाडूंनी हजर राहावे ठिकाण छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज मैदान प्रभात टॉकीज समोर सोलापूर असे आव्हान सचिव प्राचार्य दीपक शिंदे व राजेंद्र गोटे यांनी केले आहे. खेळाडूची जन्मतारीख वीस वर्षापेक्षा कमी असावी.

जि.प.शाळेत संस्कार, विचारचे देखील शिक्षण मिळते : माने

✔ सुराज्य/सोलापूर

इंग्लिश मीडियम स्कूलपेक्षा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर आदर्श विचार व चांगले संस्कार देखील मिळतात, याचा मला अभिमान आहे. गुरुजनांचा आशीर्वाद मला शैक्षणिक जीवनात मिळाला. तर राजकीय जीवनात देखील दिशादर्शक ठरल्याचे माजी आमदार दिलीपराव माने यांनी सांगितले.

जुनी पेन्शन हक्क संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी माजी आमदार दिलीपराव माने यांची भेट घेवून वाढदिवसाच्या पूर्वसंस्थेला सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी श्रीकांत मेलगे-पाटील, माजी उपसभापती संभाजी भडकुंबे, बाबासो पाटील, संघटनेचे अध्यक्ष रामराव शिंदे,तालुकाध्यक्षा स्वाती चोपडे, राज्य पदाधिकारी प्रशांत लंबे, श्याम पाटील,सौ.जयश्री मेलगेपाटील ,सुधीर बनसोडे,सुहास जाधब,दादा वायमारे,बालाजी जाधव,नानासाहेब जाधव,आशिष चव्हाण,आदि सह शिक्षक उपस्थित होते. संघटना ह्या आपल्या प्रश्नास न्याय मिळवून देण्यासाठी असतात. सर्व शिक्षक माझे आदर्श समजून मी काम करतो.

कोणत्याही प्रश्नासाठी, गरजेसाठी मी तुमच्या पाठीशी असल्याचे माने यांनी सांगितले. जुनी पेन्शन संदर्भात मी माझ्या परिने सदैव प्रयत्न करेन असे माने यांनी सांगितले. यावेळी उपस्थित शिक्षकांनी माजी आमदार दिलीपराव माने यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.यावेळी संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काँग्रेस आमदार महाआघाडीतून फुटून भाजपात प्रवेश करणार : खा.निंबाळकर यांचा दावा

✔ **सोलापूर** : भारतीय जनता पक्षाचे माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी शनिवारी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. अजित पवारांनी महाविकास आघाडीची साथ सोडल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या आमदारांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता निर्माण झाली आहे. लवकरच काँग्रेसचे आमदार महाविकास आघाडीतून फुटतील आणि ते भाजपत सामील होतील, असा खळबजनक गौप्यस्फोट खासदार निंबाळकर यांनी केला आहे

महाळुंग येथे माध्यमांशी बोलताना खा. निंबाळकर यांनी काँग्रेस आमदारांबाबत गौप्यस्फोट केला आहे. ते म्हणाले की, अजित पवार आणि त्यांच्यासोबत ३५ ते ४० आमदारांनी साथ सोडल्यानंतर महाविकास आघाडीत अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यात काँग्रेसच्या आमदारांचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे काँग्रेसचे हे आमदार लवकरच महाविकास आघाडीतून बाहेर पडतील. महाविकास आघाडीतून फुटल्यानंतर ते आमदार भाजपमध्ये प्रवेश करतील. अर्थमंत्री अजित पवार यांनी निधी दिला आहे. त्या निधीतून कोणताही आमदार आपली स्वतःची कामे करत नाही. पण, आमदार रोहित पवार यांचा निधी वाटपच्या विषयाचा अभ्यास थोडा कच्चा असावा, असा टोलाही निंबाळकर यांनी लगावला. अजित पवार भाजपसोबत आल्यामुळे वरिष्ठ नेत्यांची मने जुळे आहेत मात्र स्थानिक नेत्यांची मने जुळणार का असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्यावर सर्वांची मने जुळतील असेही खासदार निंबाळकर यांनी सांगितले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बबन शिंदे, सोलापूर जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजित शिंदे, उत्तम जानकर, भाजपचे पांडुरंग वायमोडे आदी उपस्थित होते.